## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

### सर्व साधारण सभा

सोमवार दिनांक २५.११.२०१३ रोजी सकाळी १२.०० वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या शंकररावजी चव्हाण सभागृहात भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. सदस्य उपस्थित होते.

**मा. श्री अ.सत्तार अ.गफुर,महापौर**

सर्वश्री /श्रीमती

चव्हाण आनंद शंकरराव
कल्याणकर बालाजीराव दत्तराव
पवळे उमेश देवराव
कंठेवाड सविता मारोतराव
पांढरे स्नेहा सुधाकर
अंजूम बेगम शेख अफरोज
कल्याणकर बालाजी देविदासराव
भवरे किशोर दामोधर
पांढरे सुधाकर रामराव
वाजेदा तबसुम अथर अली खान
पोकर्णा नवलकुमार ओमप्रकाश
गुर्रम विनयकुमार जगदिश
गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ
उमरेकर अशोक रावण
रजियाबेगम अय्युबखान
गाडगे शंकर जयवंतराव
गायकवाड अंजली सुरेशराव
सय्यदा इजरत फातेमा मजहर हुसेन
धबाळे गणपत गुणाजी
यादव तुळजाराम गणेशलाल
नवाब गुरुमितसिंघ ब-यामसिंघ
गिल सरजितसिंघ पंजाबसिंघ
अब्दुल फसीया फिरदोस
सय्यदा इतरत फातेमा अ.शमीम
तेहसिन बेगम अब्दुल समद
कोकूलवार लक्ष्मीबाई तुळशीराम
कुरेशी शफि अहेमद
अ.लतिफ अ.मजिद
खोमणे सुदर्शना महेश
रावत दिपकसिंह काशिनाथसिंह.
किशोर यादव
गायकवाड वैजयंती भिमराव
अभिषेक सौदे
देशमूख मंगला गजानन
सौ.ललिता मुकुंदराव बोकारे
जमदाडे करुणा भिमराव
येवनकर विजय हिराचंद
ॲड.बन श्याम वामनराव
काबरा रामनारायण रामदेव
कदम गंगाबाई नारायणराव
सातेलीकर श्रीनिवास आशन्ना
कोकाटे नागाबाई भुजंगराव
बियाणी प्रविण बालाप्रसाद
फारुख अली खॉ इलियास खॉ
मुंडे शांता मोतीराम
आनेवार गंगासागर संदीप
कदम शिला सुनिल
कनकदंडे मोहिनी महेशराव
स.जानी म.कासीम.
जाधव जयश्री आनंद
चव्हाण श्रध्दा सुशिल
जिंदम पार्वती व्यंकटेश
मुदीराज कमलाबाई रामस्वामी
सलीमा बेगम नुरुल्लाखान
देशमूख वैशाली मिलींद
देशमूख बाळासाहेब गंगाधरराव
गफारखान गुलाम महमंदखान
अनुजा अमितसिंह तेहरा
शर्मा पुषाताई राजेश
राओत्रे संगिता पृथ्वीराज
अ.हबीब अ.रहिम बागवान
स.शेर अली स.महेबूब अली
कुरेशी चॉदपाशा खाजा
फारुख हुसेन कासिमसाब
राखेवार सतिष शेषप्पा
चाऊस हसीना बेगम साबेर
गुरुखुदे सुंदरलाल किशनलाल
बावजीर शेख हबीब शे. अब्दुल्ला
अन्नपुर्णाबाई जम्मूसिंह ठाकूर
सोडी गुरुप्रितकौर दिलीपसिंघ
मोरे संजय गंगाधराव
काकडे सिंधू पांडूरंग
चिखलीकर संदिप सुभाषकराव
विनय विश्वाभंरराव पाटील
घोगरे इंदूबाई शिवाजी
कदम विश्वास बालाजी
अल केसरी हसन बिन उबेद

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. महापौर श्री अ.सत्तार अ,गफूर, हे होते. तसेच श्री जी श्रीकांत, आयुक्त, श्री राजेंद्र खंदारे, उपआयुक्त, महसुल, श्री रत्नाकर वाघमारे, उपआयुक्त (पा.पू.व म.नि.वि.), सौ.विद्या गायकवाड, उपआयुक्त (प्रशासन), सौ.मिरा कुलकर्णी, मुख्य वैद्याकिय आरोग्याधिकारी, श्री कोळेकर,कार्यकारी अभियंता, सौ.वसुधा फड, स.आयुक्त एलबीटी, श्री विजय मुंढे, स.आयुक्त आरोगय, श्री जोशी, शिक्षणाधिकारी, श्री गिरीष कदम, अभियंता.नांवामनपा नांदेड व महानगरपालिकेचे सर्व सहायक आयुक्त/क्षेत्रिय अधिकारी व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

सुरवातीस नेहमी प्रमाणे वंदे मातरम हे सामूहिक गित म्हणण्यात आले.

**रामनारायणजी काबरा** महानगरपालिकेच्या तिन्ही लिफट बंद असल्यामूळे आमच्या सारख्या वयोवृध्द सदस्यांना जिन्याने चौथ्यामजल्यावर येणे शक्य नाही लिफट जर सुरु होत नसेल तर सर्वसाधारा सभा पहिल्या मजल्यावरच घेण्यात यावी अशी माझी सुचना आहे.

**आयुक्त** लिफट बंद असल्या बध्दल प्रशासनाचे वतीने मी दिलगिरी व्यक्त करतो,(४) लिफट दुरुस्ती करण्यासाठी निविदा मागवुन निविदा मंजुरीचा प्रस्ताव स्थायी समितीस सादर करण्यात आलेला असून लवकरच संबंधित एजन्सीजला कामाचे आदेश देवून त्याकडून लिफट ची दुरुस्ती करुण घेण्यात येइल. तसेच लिफट ॲटो ऑपरेट सिस्टीम सुरु करण्यात येईल. येणा-या सर्वसाधारण सभे पर्यत लिफट दुरुस्ती करण्यात येईल.

**प्रा.ललिता बोकारे शिंदे** २४ वर्षाची प्रदीर्घ यशस्वी इनिंग खेळून १६ नोव्हेंबर २०१३ शनीवारी मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर निवृत्त झालेल्या विक्रमादित्य भारतीय कसोटीवीर श्री सचिन तेंडूलकला केंद्र सरकारने भारतरत्न हा देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार दिला.सचिनने हा पुरस्कार त्यांची आई सौ.रजनी तेडुलकर यंयाना समर्पित केला

आई एक नाव असतं
घरातल्या घरात गजबजलेले गांव असतं
आई असते जन्माची शिदोरी
सरतही नाही आणि उरत ही नाही

मराठवाडयातील थोर साहित्यीक महाकवी प्रा.फ.मु.शिंदे यांची आई हि कवितां सर्व परिचित आहे. प्रा.शिंदे यांना या वर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलनाचे अध्यक्ष पदाचा सन्मान मिळाला .हा सन्मान त्यांनी तमाम विश्वातील मातांना समर्पित केला,त्यामूळे सर्व महिला सदस्यांचे वतीने अशा मातृत्वाचा सन्मान करणा-या श्री सचिन तेंडूलकर तसेच श्री फ.मु.शिंदे यांचे अभिनंदनाचा प्रस्ताव मांडत आहे.त्या सभागृहाने एकमताने मान्यता द्यावी.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** प्रा.ललिता बोंकारे मॅडम यानी जो प्रस्ताव मांडलात्यास माझे अनुमोदन आहे.

**अनुजाताई तेहरा** आमच्या महिला नगरसेविका प्रा.शिंदे मॅडम यांनी क्रिकेटवीर सचिन तेंडूलकर यांचे अभिनंदनाचा जो प्रस्ताव मांडला त्यास माझेही अनुमोदन आहे.

**डॉ.करुणा जमदाडे** प्रा.शिंदे मॅडम यांनी मराठवाडयातील थोर महाकवी प्रा.फ.मु.शिंदे यांची अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलनाचे अध्यक्षपदी निवड झाल्याबध्दल त्याचे अभिनंदनाचा जो प्रस्ताव मांडला त्यास माझेही अनुमोदन आहे.

**विरेंद्रसिंध गाडीवाले** श्री गुरुगोविंदसिंघजी स्टेडियमच्या पश्चिम बाजुच्या पव्हेलियन गेट नं.१ ला श्री सुनिल गावस्कर यांचे नांव देण्यात आलेले आहे त्याच प्रमाणे पुर्व बाजुच्या पव्हेलियनच्या गेटला भारतरत्न पुरस्कार प्राप्त श्री सुचिन तेंडूलकर यांचे नांव देण्यात यावे असा माझा प्रस्ताव आहे.

**नवलकिशोर पोकर्णा** श्री गुरुगोविंदसिंघजी स्टेडियमच्या पव्हेलीयन पुर्व बाजुच्या गेटला सचिंन तेंडूलकर नांव देण्याचा जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** प्रा.ललिता बोकारे मॅडम यानी मराठी साहित्यीक प्रा.फ.मु.शिंदे व क्रिकेट पटू यांचे अभिनंदनाचा तसेच सभागृहनेते श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले यांचा श्री गुरुगोविंदसिंघजी स्टेडियम पव्हेलियनच्या पुर्व बाजूच्या गेटला सचिंन तेंडूलकर यांचे नांवाचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते.

**ठराव क्र.१४२** **ठराव**

२४ वर्षाची प्रदीर्घ यशस्वी इनिंग खेळून १६ नोव्हेंबर २०१३ शनीवारी मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर निवृत्त झालेल्या विक्रमादित्य भारतीय कसोटीवीर श्री सचिन तेंडूलकला केंद्र सरकारने भारतरत्न हा देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार दिला.सचिनने हा पुरस्कार त्यांची आई सौ.रजनी तेडुलकर यांना समर्पित केला,

तसेच मराठवाडयातील थोर मराठी साहित्यीक, महाकवी प्रा.फ.मु.शिंदे यांची आई हि कवितां सर्व परिचित आहे. प्रा.शिंदे यांना या वर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलनाचे अध्यक्ष पदाचा सन्मान मिळाला,हा सन्मान त्यांनी तमाम विश्वातील

मातांना समर्पित केला,त्यामूळे सर्व महिला सदस्यांचे वतीने अशा मातृत्वाचा सन्मान करणा-या श्री सचिन तेंडूलकर तसेच श्री फ.मु.शिंदे यांचे ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते हार्दीक अभिनंदान करते.

तसेच नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या श्री गुरुगोविंदसिंघजी स्टेडियमच्या पुर्व बाजूचे् पव्हेलियनच्या गेटला विक्रमादित्य सचिन तेंडूलकर असे नांव देण्यास ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते .

**दिपकसिंह रावत** महाराष्ट्र शासनाने मा.आयुक्त साहेबांच्या कारला पुर्ववत लाल दिवा लावण्याची परवानगी दिली त्याबध्दल महाराष्टाचे मुख्यमत्री मा.ना.श्री पृथ्वीराज चव्हाण याचे अभिनंदन करण्यात येते .दि.३.११.२०१३ रोजी दिपावलीच्या दिवशी सकाळी ४.४० वाजता लक्की पेन सेटर मल्टीपर्पज हायस्कुल जवळील पेनाच्या दुकानास २) रात्री २२.१६ वा.सहारा गार्मेट जूना मोंढा मनपा मंगल कार्यालयासमोरील कापड दुकानाला व रात्री १२.०० वा.राजकुमार ड्रेंसेस एमजीएम रोड वरील हबीब टॉकीज जवळील कापड दुकानास आग लागली असता अग्निशमन अधिकारी श्री शेख रईसपाशा हमीदोध्दीन यांच्या अधिनस्त अग्नीशमन विभागातील कर्मचा-यांनी आगीवर नियंत्रण मिळवून आग विझ ाविली अग्नीशमन अधिकारी श्री शे्ख रईसपाशा हमीदोध्दीन यांच्या समय सुचकता व कामाच्या कौशल्यामूळे आगीवर त्वरीत नियंत्रण मिळवून होणा-या आगीच्या मोठया दुर्घटना टळल्या आहेत त्याबध्दल श्री शे्ख रईसपाशा हमीदोध्दीन यांचे व त्यांचे अधिनस्त कर्मचा-याचे अभिनंदन करण्यात यावे. व त्याना उत्कृष्ट कार्या बध्दल मनपातर्फे आयुक्तानी प्रोत्साहनपर बक्षिस द्यावे,असा माझा प्रस्ताव आहे.

**ठराव क्र.१४३** **ठराव**

दि.३.११.२०१३ रोजी दिपावलीच्या दिवशी सकाळी ४.४० वाजता महानगरपालिका हध्दीतील १) लक्की पेन सेटर मल्टीपर्पज हायस्कुल जवळील पेनाच्या दुकानास २) रात्री २२.१६ वा.सहारा गार्मेट जूना मोंढा मनपा मंगल कार्यालयासमोरील कापड दुकानाला व रात्री १२.०० वा.राजकुमार ड्रेंसेस एमजीएम रोड वरील हबीब टॉकीज जवळील कापड दुकानास आग लागली असता अग्निशमन अधिकारी श्री शेख रईसपाशा हमीदोध्दीन यांनी व त्यांच्या अधिनस्त अग्नीशमन विभागातील कर्मचा-यांनी आगीवर नियंत्रण मिळवून आग विझविली, अग्नीशमन अधिकारी श्री शे्ख रईसपाशा हमीदोध्दीन यांच्या समय सुचकता व कामाच्या कौशल्यामूळे आगीवर त्वरीत नियंत्रण मिळवून होणा-या आगीच्या मोठया दुर्घटना टळल्या आहेत त्याबध्दल श्री शे्ख रईसपाशा हमीदोध्दीन यांचे व त्यांचे अधिनस्त कर्मचा-याचे ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा अभिनंदन करते तसेच त्याना उत्कृष्ट कार्या बध्दल नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतर्फे आयुक्तानी प्रोत्साहनपर योग्य बक्षिस द्यावे,अशी शिफारस आयुक्तांना ही ंनावामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते करते.

**दिपकसिंह रावत** मी सर्वसाधारण सभा कामकाज नियमावलीतील तरतूदीनूसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील मॅफको येथे आधूनिक कत्तलखाना उभारण्यासंदर्भात चर्चा करुन त्या विषयी निर्णय घेणे बाबतचा स्थगन प्रस्ताव दिलेला आहे. तो सभागृहात मांडण्याची परवानगी देण्यात यावी .

**महापौर** विरोधी पक्षनेते श्री दिपकसिंह रावत यांना स्थगन प्रस्ताव मांडण्याची परवानगी देण्यात येते.

**दिपकसिंह रावत** दि.२१.१०.२०१३ रोजी पशु हत्या विरोधी संघटने तर्फे जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य दिव्य मोर्चा काढण्यात आला होता हा मोर्चा कोणत्याही धर्माच्या ,जातीच्या ,पक्षाच्या विरोधात काढण्यात आला नव्हतो तो केवळ नांदेडच्या जनतेच्या हितासाठी काढण्यात आला होता व यामोर्चाची एकच मागणी होती की नांदेड शहरात कत्तलखाना होवू नये.अल मॅफकोने दि.११.५.२००९ रोजी जिल्हा उद्योग केद्राकडे जे रजिस्ट्रेशन केले होते ते मॅगो व्हिजिटेबल प्रा.लि. यांनांवाने केलेले आहे.मॅफकोची जागा पुर्वी औद्योगिकीकरणाच्या वापरासाठी होती नंतर शासनाने सदर जागेचा रहिवाशी वापरात बदल करण्यास मान्यता दिली व त्यानंतर जागा विक्री करण्यात आली. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने पारीत केलेल्या ठराव क्र.५८ मध्ये सार्वजनिक आरोग्य धोक्यात येण्यार नाही याकरीता सध्य परिस्थितीत असलेला कत्तलखान्यात अपु-या असलेल्या सुविधा देवून कत्तलखान्यास आधूनिंक रुप देण्यात यावे असे नमूद आहे. आधुनिक कत्तलखाना उभारण्यासाठी ज्या निविदा काढण्यात आल्या त्यामध्ये ७ निविदा प्राप्त झाल्या होत्या.त्यापैकी दोन एजन्सीजने मुदखेड,हस्सापुर येथील जागेवर प्रक्लप उभारण्यासाठी निविदा भरली होती. अल मॅफ्को फ्रोझन फूडस् प्रा.लिमिटेडने स्वत:च्या मालकीची जागेत आधुनिक कत्तलखान उभारण्यास सदर कंपनी तयार असल्यामूळे त्यांना कामाचे आदेश देण्यात आले.दि. २१.१०.२०१३ रोजी जो मोर्चा काढण्यात आला होता त्यावेळी मोर्चाचे शिष्टमंडळ आयुक्त साहेबांना भेटले होते तेव्हा आयुक्त साहेबांनी मी त्यांना तीन महिण्याची मुदतवाढ दिलेली आहे आता मला मुदतवाढ देण्याचा अधिकार नाही त्यामूळे सर्वसाधारण सभेस मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येईल असे सांगितलेले आहे.करारनाम्याच्या अटी व शर्तीमध्ये अनुक्रमांक १६ नुसार तीन महिण्याचे आत कत्तलखाना सुरु केला

नाहीतर करारनामा रध्द करण्यात येइल अशी तरतूद आहे.अनुक्रमांक १७ नुसार कत्तलखाना तात्काळ सुरु केला नाहीतर परवानगी रध्द करण्यात येइल अशी तरतूद आयुक्तानी तीन महिण्याची मुदतवाढ देवूनही एजन्सीजने अद्याप कत्तलखाना सुरु केलेला नाही.गुरुव्दारा बोर्डाचे अधिक्षक श्री डि.पी.सिंघ यांनी सुध्दा दि.३१.१२.२०१३ रोजी मा.पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंघजी यांचेकडे या कत्तलखान्याच्या विरोधात लेखी तक्रार केली होती त्याअनुषंगाने पंतपंधान कार्यालयाकडून महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव यांना पत्र आलेले आहे ,मा.पंतप्रधानाच्या पत्राचा अवमान करण्यात येवू नये. नांदेड शहरातील जनतेच्या हिताकरीता निविदा रध्द करावी.मालमत्ता विभागातील लिपिक श्री नखाते यांनी वरिष्ठाकडे संचिका सादर करतांना आपल्या कार्यालयीन टिप्पणीत नांदेड शहरात कत्तलखाना उभारण्यात येवू नये असे मत मांडले होते. करीता माझी सभागृहास अशी विनती आहे मी मांडलेल्या सविस्तर मुध्दाचा विचार करावा व नांदेड शहरात कत्तलखाना उभारण्याच्या संदर्भात योग्य तो निर्णय घेण्यासाठी एक सर्व पक्षिय उपसमिती कायम करण्यात यावी व कत्तलखानाच्या सदर्भात आजच्या सभेत जी काही चर्चा झालेली आहे त्या अनुषंगाने सभागृहाच्या भावना मा.जिल्हाधिकारी नांदेड यांना कळविण्यात याव्यात.

**सरजितसिंघ गिल** विरोधी पक्षनेते श्री दिपकसिंह रावत यांनी कत्तलखान्याच्या संदर्भात स्थगन प्रस्ताव आणलेला आहे.नांदेड दक्षिणचे आमदार श्री ओमप्रकाशजी पोकर्णा, एमआयएम नगरसेवक यांनी निवेदने दिलेली आहे तसेच कत्तलखान्याच्या विरोधात भव्य असा मोर्चा काढून निवेदने दिलेली आहेत या निवेदनाच्या अनुषंगाने प्रशासनाने व मा.जिल्हाधिकारी नांदेड यांनी काय कार्यवाही केली व काय कार्यवाही करण्यात येणार आहे याचा खुलास प्रशासनाने सभागृहात करावा.

**शेर अली** कत्तलखाना शहरात होवू नये शहराबाहेर व्हावे अशी आमच्या पक्षाची मागणी आहे .कारण ज्या ठिकाणी कत्तलखाना प्रस्तावित आहे त्या परिसरात नागरी वस्ती असून कत्तलखानामध्ये अमोनिया गॅसचा वापर करण्यात येणार आहे.जर अमोनिया गॅस गळती
झाली तर त्या भागातील नागरीकांना इजा होवून हानी पोहचु शकते त्यामूळे कत्तलखाना शहरात न होता शहराबाहेर करण्यात यावा.कत्तलखान्याची जी जागा आहे ती जागा रहिवाशी वापरासाठी असून त्या जागेचा वापर औद्योगिक (इडस्ट्रीज )करीता करता येत नाही. आयुक्तानी याची दखल घेवून सर्व निविदातील अटी व शर्तीनुसार निविदा रध्द करण्यात यावी

**सुदर्शना खोमणे** नांदेड शहराच्या दाट लोक वस्तीत कत्तलखाना उभारणे योग्य नाही म्हणून जनहिता
करीता कत्तलखान्याची निविदा रध्द करण्यात यावी.अशी सभागृहास विनंती आहे.

**रामनारायणजी काबरा** नांदेड शहरात कत्तलखाना होवू नये शहराबाहेर व्हावे अशी सर्वाची मागणी आहे.

**गुरुप्रितकौर सोडी** जो आधुनिक कत्तलखाने का प्रस्ताव सत्ताधारीयोकी तरफसे डाला गयाहै वो प्रस्ताव रध्द किया जाए ये श्री गुरुगोविंदसिंधजीकी नगरी है अगर ये कत्तलखाना डाला गया तो एक जानवर को धोने की लिए ७००-८०० लिटर पाण्ी लगता है और कत्तलखाना चालू हो गया तो रोज लाखो लिटर पाणी गोदावरी मे जाएंगा इसे गोदावरी का पाणी गंदा हो जाएगा और बहुत सारे मंदिर और गुरुव्दारे गोदावरी नदी के किनारे बने है और बहुतसे लोग गोदावरी नदीमे स्नान करते है जिसे उनका धर्म भ्रष्ट हो जाएगा इस कत्तलखाने मे कॉग्रेसवाले के बच्चे भी शामील है.और धुपकालेमे लोगोको पिने के लिए पाणी नही मिलता ये कत्तलखानेके वजेसे लाखो लिटर पाणी वेस्ट जाएगा इसलीय सत्ताधारीयोका प्रस्ताव हिंदू और सिख धर्म का दिल दुखानेवाला है ये प्रस्ताव रध्द किया जाएगा नही तो हम इसके खिलाफ आंदोलन करेंगे

**आयुक्त** दोन वर्षापुर्वी जून्या नांदेड शहरात रक्त मिश्रीत दुषित पाणी पुरवठा केला म्हणून नागरीकांनी तत्कालिन आयुक्त, उपआयुक्त,कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांचे विरुध्द न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या याची आपणास कल्पणा आहे. नांदेड शहरात विविध भागातअनाधिकृतरित्या जनावराच्या बक-यांच्या कत्तली करण्यात येतात व त्याचे घाण पाणी नालीत सोडण्यात येते यामूळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात येते म्हणून शासनाने उघडयावर जनावराच्या बकऱ्याच्या कत्तली करण्यास बंदी घातलेली आहे. आधूनिक कत्तलखान्यासाठी उभारण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने योजना तयार केलेली असून या योजने अंतर्गत शासनाकडून कत्तलखाना उभारण्यासाठी ५० टक्के निधी मिळणार असून ५० टक्के निधी महानगरपालिकेने द्यावयाचा आहे.शासनाच्या सदर योजने लाभ घेण्यासाठी तत्कालिन आयुक्तांनी सर्वसाधारण सभेत प्रस्ताव सादर केला होता व त्यावेळी सभागृहात कत्तलखान्याच्या बाबतीत कुणीही आक्षेप घेतला नव्हता एकमताने सदर प्रस्तावास मान्यता दिली होती व सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनेच कत्तलखाना सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यावेळी कत्तलखाना शहरा बाहेर व्हावा अशी

सभागृहात कोणीही मागणी केली नव्हती.महासभेच्या मान्यतेनेच सबंधित एजन्सीजशी करारनामा करुन कामाचे आदेश देण्यात आलेले आहे.

**दिपकसिंह रावत** त्यावेळी श्री साबेर चाऊस ,श्री अरशद बेग,यांनी आक्षेप नोंदविला होता.

**आयुक्त** आधुनिकरित्या कत्तलखाना उभारण्यात येत असून या कत्तलखान्याकरीता पशु वैद्यकिय अधिका-याची नेमणूक करण्यात येणार असून पशु वैद्यकिय अधिका-यांचे प्रमाणपत्र धेवूनच जनावराची कत्तल करण्यात येणार आहे. तसेच कत्तलखान्यात जनावराचे पोस्टमार्ट्म करताना चित्रीकरण करण्यसाठी सि.सि.टि.व्हि.कॅमरे बसविण्यत येणार आहे.कत्तलखान्यात गायीची कत्तल करण्यात येईल,कत्तलखान्यात अमोनीया गॅस लिकेज झाल्यास नागरीकांना त्रास होईल,घाण पाणी गोदावरी नदीत मिसळेल अशा प्रकारच्या तक्रारी करण्यात आल्या आहेत . परतु तसा काही प्रकार होणार नाही. शासनच्या विविध विभागाकडून प्रदूषण ,पर्यावरण आदी विभागाची मान्यता घेण्यात आलेली असून त्यानी ज्या अटी व शर्ती घातलेल्या आहेत त्या अटी व शर्तीनुसार कत्तलखाना उभारण्यासाठी परवानगी देण्यात आली.या कत्तलखान्यातील घाण पाणी वाहुन जाण्यासाठी भूमिगत पाईप लाईन टाकण्यात येणार असून त्याव्दारे शहराच्या हध्दीबाहेर घाण पाणी काढून देण्यात येणार आहे.त्यामूळे गोदावरी नदीत घाण पाणी मिसळण्याचा प्रश्नच येत नाही. या आधूनिक कत्तलखान्या पासून त्या परिसरातील नागरीकांना अमोनीया गॅसचा कोणताही धोका होणार नाही.प्रत्येक जनावराचे कत्तल करण्यापुर्वी सि.सि.टि.व्हि.कॅमराव्दारे चित्रीकरण करण्यात येणार आहे. जनजागृतीव्दारे या सर्व बाबीची माहिती नागरीकांना होणे आवश्यक आहे जेणे करुन नागरीकाचा विरोध कमी होईल. शहरात हा कत्तलखाना होवू नये म्हणून शहरातील नागरीकांना मोर्चा काढला होता या मोर्चातील शिष्टमंडळाने मा.जिल्हाधिकारी नांदेड यांची भेट घेवून निवेदन दिले होते तेंव्हा जिल्हाधिकारी यानी या निवेदनातील तक्रारीची चौकशी करुन अहवाल सादर करण्याकरीता उपविभागिय अधिकारी, नांदेड.तहसिलदार, नांदेड व महानगरपालिकेचे उपआयुक्त (महसुल) यांची एक उपसमिती कायम केलेली आहे. ही उपसमिती चौकशी करुन अहवाल सादर करतील. कत्तलखाना उभारण्याच्या कामास मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभे समोर सादर करण्यात येईल.जिल्हाधिकारी नांदेड यांनी जी उपसमिती कायम केलेली आहे त्याची माहिती उपआयुक्त महसुल यांनी सभागृहास द्यावी.

**उपआयुक्त महसुल** कत्तलखाना विरोधात काढण्यात आलेल्या मोर्चातील शिष्टमंडळाने मा.जिल्हाधिकारी ,नांदेड यांना निवेदन दिले होते त्या निवदेनाच्या अनुषंगाने मा.जिल्हाधिकारी ,नांदेड यांनी कत्तलखाना उभारण्याच्या संदर्भात चौकशी करुन अहवाल तयार करण्यासाठी उपविभागिय अधिकारी,महानगरपालिकेचे उपआयुक्त (महसुल) व तालुका दंडाधिकारी यांची एक उपसमिती कायम केलेली असून या उपसमितीस आपला अहवाल सादर करण्यास आदेशित केलेले आहे.

**दिपकसिंह रावत** जो पर्यत या उपसमितीचा अहवाल येत नाही तो पर्यत कत्तलखान्याचे काम थांबविण्यासाठी संबंधित एजन्सीजला आदेश द्यावेत.व एजन्सीजला कोणत्याही प्रकारची कामाची मुदतवाढ देण्यात येवू अशा सभागृहाच्या भावना मा.जिल्हाधिकारी नांदेड व आयुक्त मनपा यांना कळविण्यात याव्यात असा निर्णय महापौरांनी या स्थगन प्रस्तावावर घ्यावा

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** सौ.सोडी मॅडम यांनी कत्तलखान्याचे दुषित पाणी गोंदावरी नदीत जावून गोदावरीचे पाणी दुषित होते असे सांगितले हे बरोबर आहे इतवारा भागात दर रविवारी जवळपास १०० बेक-याची कत्तल होते त्याची घाण कुठे जाते गोदावरी जात आहे. हे घाण पाणी नदीत जाते याबाबत प्रशासनाने काय उपाय योजना करीत आहेत याचा खुलासा करण्यात यावा. आधुनिक कत्तलखाना व्हावा ही सर्वाची मागणी आहे. आधुनिक कत्तलखाना होण्यासाठी मा.जिल्हाधिकारी नांदेड यांनी जी उपसमिती कायम केली त्याबध्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येते.

**दिपकसिंह रावत** कत्तलखाना उभारण्यास विरोध नाही. तो शहरात होवू नये अशीच सर्व पक्षिय मागणी आहे.

**महापौर** आयुक्त साहेबांनी खुलासा केलेला आहे की सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्याप्रमाणे कत्तलखाना उभारण्यासाठी निविदा मागवून एजन्सीजला कामाचे आदेश देण्यात आले. शहरात कत्तलखाना होत असल्यामूळे त्या विरोधात शहरातील नागरीकांनी विविध संघटनांनी विरोध करुन मोर्चा काढला होता व मोर्चाचे शिष्टमंडळाने मा.जिल्हाधिका-यांना भेटून सविस्तर निवेदन दिले होते त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी अधिकाऱ्याची उपसमिती गठित केलेली असून अहवाल सादर करण्यास सुचित केलेले आहे.करीता या उपसमितीचा जो काही अहवाल असेल तो पुढील सभेत ठेवण्यात यावा त्या अहवालावर सभागृहात चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल तो पर्यत संबंधीत कंत्राटदारास कत्तलखान्याचे काम थांबविण्यासाठी

कळविण्यात यावे व पुढील मुदतवाढ महासभेची मान्यता घेवूनच द्यावी असे सभागृहाचे मत आहे त्याप्रमाणे मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.१४४** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीत मॅफकोच्या जागेवर आधुनिक कत्तलखाना उभारण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे परंतु शहरातील मध्यवर्ती भागात कत्तलखाना होत असल्यामूळे त्या विरोधात शहरातील नागरीकांनी विविध संघटनांनी विरोध करुन मोर्चा काढला होता व मोर्चाचे शिष्टमंडळाने मा.जिल्हाधिका-यांना भेटून सविस्तर निवेदन दिले होते, विविध पक्षाच्या लोकप्रतिनिधीही शहरात कत्तखाना होवू नये म्हणून आयुक्त, महानगरपालिका नांदेड व जिल्हाधिकारी नांदेड यांचेकडे निवेदने दिलेली आहेत त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी,नांदेड यांनी कत्तलखाना उभारण्याच्या संदभर्ज्ञत शासकीय अधिकाऱ्याची एक उपसमिती गठित केलेली असून या उपसमितीस तांत्रिकदृष्टया तपासणी करुन आपला अहवाल सादर करण्यास सुचित केलेले असून या उपसमितीचा जो काही तांत्रिक अहवाल असेल तो पुढील सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा त्या अहवालावर सभागृहात चर्चा करुन निर्णय घेण्यात यावा तो पर्यत संबंधीत कंत्राटदारास कत्तलखान्याचे काम थांबविण्यासाठी कळविण्यात यावे व पुढील मुदतवाढ सभागृहाचे मान्यते शिवाय देवू नये असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

**रामनारायणजी काबरा** आयुक्ताना त्यांचे वाहनावर लाल दिवा बसविण्यास परवानगी दिल्याबध्दल मुख्यमंत्र्याचे अभिनंदन करण्यात येते आहे परतु नांदेड शहरासाठी एफएसआय वाढविण्यासाठी मान्यता देण्याचा प्रस्ताव मा.मुख्यमंत्र्यांना का सादर करण्यात येत नाही.माझी महापौरांना विनंती आहे की.महानगरपालिकेतील सर्व पक्षाचे् नगरसेवकाचे एक शिष्टमंडळ घेवून मुंबईला जावे मा.मुख्यमंत्र्याची भेट धेवून त्यांना एफएसआय वाढविण्याची मागणी करावी.शहरात भरमसाठ जागेच्या किमती वाढल्यामूळे नागरीकांची अनाधिकृत बांधकामे करण्याची प्रवृत्ती वाढली आहे.एफएसआय वाढविला तर अनाधिकृत बांधकामाचा प्रश्न सुटू शकेल.याबाबत आयुक्त साहेबांनी खुलासा करावा.

**आयुक्त** स.सदस्यांनी एफएसआय वाढविण्याची मागणी केली आहे.याबाबत खुलासा करण्यात येतो की.तत्कालिन मुख्यमंत्री मा.श्री अशोकरावजी चव्हाण साहेब व मुख्यमंत्री मा.ना.श्री पृथ्वीराज चव्हाण साहेब यांनी एकत्रित विचार विनियम करुन नांदेड शहरासाठी सुधारीत विकास नियंत्रण नियमावलीस (डिसीआर) मान्यता दिलेली असून ती नियमावली नांदेड शहरासाठी लागू झाोली आहे ही नियमावली पुर्ण महाराष्ट्रात लागू करता येइ्ल काय याकरीता महाराष्ट्र शासनाने एक अभ्यास समितीही कायम केलेली आहे.या अभ्यास समितीचा मी ही सदस्य आहे. या विकास नियंत्रण नियमावली नुसार नागरीकांना १.४ पर्यत बांधकाम करता येणार आहे.चटई निर्देशाक एफएसआय मध्ये वाढ करण्याचे अधिकार शासनास आहे. त्यामूळे सर्वसाधारण सभेने एफएसआयमध्ये १.८ पर्यत वाढ करण्याची शिफारस शासनास करावी. शासन त्यावर विचार करील.नविन डिसीरुल मध्ये शहरातील नागरीकांना मोठया प्रमाणात दिलासा मिळालेला आहे यामूळे नागरीकांना गॅलरी,जिना,पोर्च चे अतिरिक्त बांधकाम करता येणार आहे. याचा नागरीक लाभ घेत आहेत.

**रामनारायणजी काबरा** शासनास एफएसआय वाढवून देण्याची मागणी करण्यास काय अडचण आहे. महापौरांनी महानगरपालिकेचे एक शिष्टमंडळ मुंबईला मुख्यमंत्र्यांना भेटण्यासाठी घेवून जावे.

**शफि अहेमद कुरेशी** श्री रामनारायणजी काबरा यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.महानगरपालिकेचे एक सर्व पक्षिय शिष्टमंडळ मुंबईला मुख्यमंत्र्यांना भैटण्यासाठी धेवून जावे.

**दिपकसिंह रावत** मा.मुख्यमंत्र्यांना एफएसआय वाढविण्यासाठी मागणी करण्याचे निवेदन देण्यासाठी सर्व पक्षिय समिती कायम करुन सर्व पक्षिय शिष्टमंडळ मुख्यमंत्र्याना भेटण्यासाठी घेवून जावे

**सरजितसिंघ गिल** आयुक्त साहेबांनी जी सुचना केली ती अत्यंत चांगली आहे. महापौरांनी महानगरपालिकेचे एक शिष्टमंडळ मुंबईला घेवून जावून मा.मुख्यमंत्र्याची भेट घेवून त्यांना एफएसआय वाढवून देण्याची मागणी करावी.

**अ.हबीब अ रहिम.** महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोनातून हैदरबाग पाण्याच्या टाकीखाली शॉपिंग कॉम्प्लेक्सचे बांधकाम करण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे . तरी सदरील ठिकाणी शॉपिंग कॉम्पलेक्सचे बांधकाम त्वरीत करण्यात यावे जेणे करुन महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल व सुशिक्षित बेकारांना आपला व्यवसायही करता येइ्ल.

**महापौर** श्री रामनायणजी काबरा,श्री शफि अहेमद कुरेशी व श्री दिपकसिंह रावत यांनी सुचविल्या प्रमाणे मा.मुख्यमंत्र्यांना नांदेड शहरासाठी एफएसआय वाढवून देण्याचे निवेदन देण्याकरीता करीता एक सर्व पक्षिय शिष्टमंडळ मुंबई येथे पाठविण्यात येईल.

**ठराव क्र.१४५** **ठराव**

नांदेड शहराचा झपाटयाने विकास होत असून शहरातील जमिनीच्या किमतीत दिवसेंदिवस वाढ होत असल्यामूळे व शासनाने शहरासाठी चटई निर्देशाक (एफएसआय) १ मंजुर केलेला असल्यामूळे नागरीकांचा विना परवानगी अनाधिकृत बांधकामे करण्याचा कल वाढलेला आहे.व मोठया प्रमणात झालेल्या अनाधिकृत बांधकाम विरुध्द नियमानूसार कार्यवाही करण्यास महानगरपालिकेस कठिण होत आहे. जर महाराष्ट्र शासनाने महागनरपालिका हध्दीत चटई निर्देशाक (एफएसआय ) १.८ किंवा २ करण्यास मान्यता दिली तर शहरातील नागरीक नियमानुसार बांधकाम परवानगी घेवून बांधकाम करतील तसेच नागरीकंानी केलेल्या वाढीव अतिरिक्त बांधकामानां नियमानुसार परवानगी देता येईल.व या मूळे महानरगपालिकेच्या उत्पन्नातही वाढ होईल. करीता मा.मुख्यमंत्री ,महाराष्ट्र राज्य यांना भेटून नांदेड शहरासाठी चटई निर्देशांक १.८ किवा २ करण्यास मान्यता देण्यासाठीचे निवेदन देण्याकरीता महापौरांनी सर्व पक्षिय सदस्यांचे एक शिष्ट मंडळ मुंबई येथे धेवून जावे असे ही नंावामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** नांदेड वाधाळा शहर महानगरपालिकेने अनाधिकृत बांधकामे नियमित करण्यसाठी मंजुर सुधारीत विकास नियत्रण नियमावलीनूसार हार्डशिप प्रिमियम घेवून नियमित करण्यास मान्यता दिलेली आहे पंरतु मध्ये टिडीआर लागू होत नाही. करीता या सुधारीत विकास नियंत्रण नियमावलीत टिडीआर सुध्दा लागू करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा.

**सरजितसिंघ गिल** या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** श्री विरेद्रसिंध गाडीवाले यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो

**ठराव क्र.१४६** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने अनाधिकृत बांधकामे नियमित करण्यसाठी मंजुर सुधारीत विकास निंयत्रण नियमावलीनूसार हार्डशिप प्रिमियम घेवून मान्यता दिलेली आहे पंरतु जे नागरीक मंजुर सुधारीत विकास निंयत्रण नियमावलीनूसार हार्डशिप प्रिमियम मध्ये नियमित करुन घेतात त्यांना टिडीआर योजना लागू होत नाही. करीता या सुधारीत विकास नियंत्रण नियमावलीत टिडीआर सुध्दा लागू करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा असे ही नंावामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

**स.जानी** अेटूझेड कंत्राटदार प्रभागात नियमित साफसफाई करीत नाही जमा झालेला कचरा उचलत नाही त्यामूळे प्रभागात गंदगी वाढली आहे. अेटूझेड कंत्राटदराराचे मजुरावर संपुर्ण नियंत्रण त्यांचे सुपरवायझरकडे असल्यामूळे मजुर महानगरपालिकेच्या स्वच्छता निरिक्षकाचे काम ऐकत नाही.प्रभागातील सर्व साफसफाईच्या कामाची जबाबदारी स्वच्छता निरिक्षकांकडे देण्यात यावी जेणे करुन प्रभागातील साफसफाई चांगल्या प्रकारे होवू शकेल.अेटूझेड कंत्राटदाराने प्रत्येक प्रभागासाठी २-२ मजुर देण्यात दिलेले असून त्यांचेकडून प्रभागातील साफसफाई होत नाही त्यामूळे कंत्राटदारास जास्त मजुराची नेमणूक करण्यासाठी आदेश देण्यात यावे. प्रशासनाने प्रभागातील साफसफाईच्या कामाची पुर्ण जबाबदारी त्या त्या भागातील क्षेत्रिय अधिकारी व स्वच्छता निरिक्षकांकडे देवून साफसफाईच्या कामाकडे अधिक लक्ष द्यावे अशी आमची मागणी आहे.

**किशोर यादव** ६ महिण्यापुर्वी वजिराबाद प्रा.शाळेत माध्यमिक वर्ग सुरु करण्यासाठी सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे परंतु त्याची अमलबजावणी करण्यात येत नाही. विशेष बाब म्हणून वजिराबाद प्रा.शाळेत माध्यमिक वर्ग सुरु करण्यासाठी मान्यता देण्यात यावी. माझ्या प्रभागात रस्ता क्र.१७ चे काम विना निविदा एस.कुमार यांना देण्यात आलेले असून सदरील रस्त्याचे काम बरोबर होत नसल्यामूळे कामाची चौकशी करण्यासाठी सांगितले परंतु त्याची अद्याप चौकशी करण्यात आलेली नाही. याकामाची चौकशी करण्यात यावी मुरमुरा गल्लीतील नालीचे पाणी रस्त्यावर वहात असल्यामूळै नागरीकंाना त्रास होत आहे. करीता सदरील नाली दुरुस्तीचे काम अेएमआरसी करीत नाही सदरील काम तातडीने करणे गरजेचे असल्यामूळे सदरी नाली दुरुस्तीचे काम त्वरीत करण्यात यावे अशी मागणी आहे.

**सुदर्शना खोमणे** आजच्या सभेत स.संचालक नगररचना हे अनुपस्थित आहेत.सं.संचालक नगरररचना हे रजेवर जात असल्यामूळे नागरीकांना वेळेवर बांधकाम परवानगी मिळत नसल्यामूळे नागरीकांची गैरसोय होत आहे तसेच महानगरपालिकेचे उत्पन्नही बुडत आहे.

**दिपकसिंह रावत** स.संचालक नगररचना यांचे नगररचना विभागाशी संबंधी सर्वसाधारण सभेस प्रस्ताव येणार आहे म्हणून त्यांनी १५ दिवसाची रजा घेतल्याचे समजते स.सचांलक,नगररचना यांचे पदाचा अतिरिक्त पदभार कोणाला देण्यात आला याचा खुलासा आयुक्त साहेबांनी करावा.

**आयुक्त** प्रत्येक अधिकरी कर्मचा-यांना त्यांच्या वैयक्तीक कारणासाठी आवश्यकते नुसार व गरजेनुसार रजा घेण्याचा अधिकार असून नियमानुसार रजा मंजुर करण्यात येतात.दिर्घ रजेच्या कालावधीत दुस-या

अधिका-यास चार्ज देण्यात येतो.अधिकारी कर्मचारी रजेवर असला तरी कामे प्रलंबित रहात नाही.कामे पुर्ण करण्यात येतात.

**अंजली गायकवाड** कु.जिया राजु धुमाळे रा. जयभिमनगर, नांदेड हि ०६ वर्षाची असुन तिला किडणी डायलिसीसचा रोग झाला आहे. तसेच तिच्या आई, वडीलांची आर्थिक परिस्थिती हलाकीची असुन त्यांना मुलीच्या आजारावर होणारा खर्च झेपत नसल्याने पिडीत मुलीसाठी महिला व बालकल्याण समिती, महानगरपालिकेकडुन किंवा नगरसेवकांच्या मानधनातुन आर्थिक सहाय्यता देण्यात यावी.यापुर्वी श्री. जानी भाई (नगरसेवक) लेबर कॉलनी यांच्या प्रभागातील पिडित रूग्णास मदत करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवल्यावर त्या प्रस्तावास सर्वसाधरण्स सभेने मान्यता देऊन संबंधीत रुग्णास मदत केली होती. तरी कु. जिया राजु धुमाळे रा.जयभिमनगर, नांदेड हिला देखील आर्थिक मदत करून जिवदान देण्याचे पुण्यकर्म आपल्या हातुन व्हावे अशी सभागृहास विनंती आहे.

**महापौर** स.सदस्यांच्या मानधनातून आर्थिक मदत देण्याचा ज्याचा त्याचा वैयक्तीक प्रश्न आहे आपण त्यांचेवर दबाव आणू शकत नाही.जे स.सदस्य आपल्या मानधनातून आर्थिक मदत देण्यास तयार असतील त्यांनी नगरसचिवाकडे तशी लेखी संमती द्यावी.

**ठराव क्र.१४७** **ठराव**

कु. जिया राजु धुमाळे रा. जयभिमनगर, नांदेड येथील रहिवाशी असुन या मुलीची किडणी निकामी झाल्यामूळे डायलिसीसची ट्रिटमेंट घ्यावी लागत असून याकरीता मोठया प्रमणावर खर्च करावा लागत आहे. तिच्या आई, वडीलांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाकीची असुन त्यांना मुलीच्या किडनीच्या उपचाराचा व औषधौचपचाराचा खर्च करण्यास असमर्थ आहेत. करीता कु. जिया राजु धुमाळे रा. जयभिमनगर, नांदेड यांच्या पुढील उपचारासाठी सामाजिक भावनेतून नगरसेवकांनी आपल्या मानधनातून आर्थिक मदत द्यावी. असे ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा संमत करते. नगरसचिव यांनी महानगरपालिकेचे जे नगरसेवक आपल्या मानधनातून रक्कम देण्यास संमती देतील त्याप्रमाणे सम्मतीच्या रक्कमेचा धनादेश चेक कु. जिया राजु धुमाळे रा. जयभिमनगर, नांदेड याचे नावे देण्याची कार्यवाही करावी.

**सरजितसिंघ गिल** सर्वच प्रभागातील गरीब नागरीक औषधोपचारासाठी मागणी करतात नगरसेवकांना फक्त ७५००/- मानधन मिळते त्यामूळे मानधन वाढविण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यात यावा.

**दिपकसिंह रावत** शासनाने नगरसेवकांना रु. ७५००/-मानधन व बैठक भत्ता रु.१००/-याप्रमाणे देण्याची मान्यता दिलेली आहे परंतु सध्या दुरध्वनी ,लेखनसामुग्री व टपाल व प्रवास खर्चात मोठया प्रमाणात वाढ झालेली असल्यामूळे सदरील मानधन व बैठक भत्ता कालबाहय झालेले आहे म्हणून नगरसेवकांचे मानधन प्रतिमहारु.१५,०००/- व बैठक भत्ता रु.३००/-याप्रमाणे देण्याकरीता महाराष्ट्र शासनास विनंती करण्यात यावी

**महापौर** श्री सरजितसिंघ गिल यांनी मांडलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१४८** **ठराव**

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. संकिंर्ण २००९/प्र.क्र.१४८/नवि-२६ दि.२२ जानेवारी २०१० अन्वये राज्यातील महानगरपालिकेतील सदस्यांचे रु.७,५००/-प्रतिमहा मानधन व बैठक भत्ता १००/- या प्रमाणे करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु सध्या दुरध्वनी ,लेखनसामुग्री व टपाल व प्रवास खर्चात मोठया प्रमाणात वाढ झालेली असल्यामूळे सदरील मानधन व बैठक भत्ता कालबाहय झालेले आहे म्हणून नगरसेवकांचे मानधन प्रतिमहा रु.१५,०००/-व बैठक भत्ता रु.३००/-याप्रमाणे देण्याकरीता महाराष्ट्र शासनास विनंती करण्यात यावी असे ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

**आयुक्त** केंद्र शासनाने आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील व दारिद्र रेषेखालील नागरीकांना राजीव गांधी आरोग्य जिवनदायी योजना मंजुर केलेली या योजनेतून आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील व दारिद्र रेषेखालील नागरीकांना मोठयाप्रमाणात लाभ मिळणार आहे.या कु. जिया राजु धुमाळे रा. जयभिमनगर, नांदेड यांना लाभ मिळू शकेल तसेच महानगरपालिकेने शामनगर येथील कस्तुरबा मातृसेवा केंद्र शासनास हस्तांतरीत केलेले असून शासनाने या दवाखान्यात रुग्णांना डायलेसीसची सुविधा उपलब्ध्द करुन दिलेली असून या दवाखान्यात कु. जिया राजु धुमाळे रा. जयभिमनगर, नांदेड यांचेवर उपचार करता येईल.

**सरजितसिंघ गिल** पंतप्रधान मा.डॉ.मनमोहनसिंघजी ,युपीअेच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांनी आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील व दारिद्र रेषेखालील नागरीकांकरीता राजीव गांधी आरोग्य जिवनदायी योजना मंजुर केलेली असून या योजने अंतर्गत -हदय विकारग्रस्त,कॅन्सरग्रस्त ,किडनीचा आचार ई.सारख्या गंभिर स्वरुपाचा आजार असलेल्या रुग्नांना औषधोपचार व शस्त्रक्रियेकरीता रु.२.५० लक्षाची आर्थिक मदत मिळणार असल्यामूळे नागरीकांना खुप मोठा दिलासा मिळणार आहे.नुकतेच नागपुर येथे पंतप्रधान मा.डॉ.

मनमोहनसिंघजी, श्रीमती सोनिया गांधी. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.ना.श्री पृथ्वीराज चव्हाण यांचे हस्ते झालेले आहे ही योजना राबविण्यासाठी आमचे नेते श्री अशोकरावजी चव्हाण,माजी मुख्यमंत्री यांनी केंद्र शासनाकडे पाठपूरावा केलेले आहे त्याबध्दल पंतप्रधान मा.डॉ.मनमोहनसिंघजी ,युपीअेच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.ना.श्री पृथ्वीराज चव्हाण
श्री अशोकरावजी चव्हाण,माजी मुख्यमंत्री,यांचे अभिनंदन करण्यात यावे.

**दिपकसिंह रावत** केंद्र शासनाने आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील व दारिद्र रेषेखालील नागरीकांकरीता राजीव गांधी आरोग्य जिवनदायी योजना मंजुर केली त्याबध्दल केंद्र शासनाने अभिनंदन करण्यात यावे.

**महापौर** श्री सरजितसिंघ गिल यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.१४९** **ठराव**

नुकतीच केद्र शासनाने देशातील आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील व दारिद्र रेषेखालील नागरीकांकरीता राजीव गांधी आरोग्य जिवनदायी योजना मंजुर केलेली असून या योजनेचे उदघाटन नागपुर येथे पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंघजी.यांचे हस्ते झाले आहे या योजने अंतर्गत -हदय विकारग्रस्त,कॅन्सरग्रस्त ,किडनीचा आचार ई.सारख्या गंभिर स्वरुपाचा आजार असलेल्या रुग्नांना औषधोपचार व शस्त्रक्रियेकरीता रु.२.५० लक्षाची आर्थिक मदत मिळणार असल्यामूळे नागरीकांना खुप मोठा दिलासा मिळणार आहे.म्हणून पंतप्रधान डॉ.मनमोहनसिघजी, युपीअेच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी ,महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.ना.श्री पृथ्वीराज चव्हाण, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मा.आ.श्री अशोकरावजी चव्हाण यांचे ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते अभिनंदन करते.

**गफारखान** माझ्या प्रभागातील पंचशिलनगरातील नागरीक त्यांचे एरियात रस्ते,ड्रेनेज लाईन,स्ट्रिट लाईटई. मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध्द करुन देण्यासाठी महानगरपालिकेच्या कार्यालयासमोर उपोषणास बसले आहेत. पंचशिल नगरात जवळपास ३०० आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील नागरीक राहत आहेत. त्यांना बिएसयुपी योजने अंतर्गत घराचे बांधकामाचा प्रस्ताव दिला होता ब्रम्हपुरी भागात बिएसयुपी योजने घराचा प्रस्ताव मंजुर झाला परंतु पंचशिलनगरात बिएसयुपी योजने अंतर्गत घराचे बांधकामाचा प्रस्ताव परत आलेला आहे.या भागात कोणत्याच प्रकारच्या नागरी सुविधा नाही. स्ट्रीट लाईट नाही. श्री रत्नाकर वाघमारे. उपआयुंक्त ,सभापती,स्थायी समिती,बांधकाम व पाणी पुरवठा विभागाचे अभियंत्यानी याभागाची पाहणी केलेली आहे. आर्थिक दृष्टया दुर्बल घटकासाठी राखीव असलेल्या ५ टक्के निधीतून डब्युलबिएम रस्ते.लाईट,ई.नागरी सुविधा उपलब्ध्द करुन देण्यसाठी सर्वसाधारणसभेने दोन वर्षापुर्वी मान्यता दिलेली आहे परंतु ठरावाची अमलबजावणी करण्यात येत नाही यासंदर्भात मी वारंवार विनंती पत्रेही दिलेली आहे.मुख्य लेखाधिकारी याचे अहवाल मागविण्यात येत आहे.अजून त्यावर कार्यवाही झालेली नाही याबाबत आयुक्त साहेबांनी खुलासा करावा.

**महापौर** पंचशिल नगराचा सर्व्हे करुन आवश्यक त्या कामाचे अंदाजपत्रक तयार करुन ५ टक्के राखीव असलेल्या तरतूदीतून कामे करण्यात यावीत.

**आयुक्त** बिएसयुपी योजने अंतर्गत पंचनशिल नगरातील नागरीकांना घरे बांधून देण्यासाठी प्रस्ताव शासनास सादर केला होता परंतु शासनाने तो प्रस्ताव वापस केलेला आहे.देशातील ज्या शहरात बिएसयुपी योजने अंतर्गत घरे बांधून देण्याचे काम चालू होते ती सर्व कामे सध्या बंद आहेत. आता आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील नागरीकांकरीता केद्र शासनाने राजीव गांधी आवास योजना मंजुर केलेली असून या योजने अंतर्गत ५० टक्के वाटा शासनाचा राहणार असून ५० टक्के वाटा लाभार्थ्याचा राहणार आहे. जे लाभार्थी आपला वाटा ५० टक्के खर्च भरण्यास तयार असतील त्यांचे करीता ही योजना सुरु करण्यास हरकत नाही. महानगरपालिकेतर्फे सर्व्हे करण्याचे काम सूरु आहे. पंचशिलनगरातील नागरीक ५० टक्के रक्कम भरण्यास तयार असतील तर त्यांचा या योजने समावेश करता येइल.

**गफारखान** बिएसयुपी योजने अंतर्गत प्रलंबित असलेल्या घराचे बांधकाम रेट कॉन्ट्रक्टवर करण्याचा प्रस्ताव प्रलंबित आहे.

**आयुक्त** या संदर्भात बिएसयुपीचे सचिव यांचेशी चर्चा करण्यात येणार आहे. सध्या बिएसयुपी योजने अंतर्गत ३३३९ घरकुले मूळ भागात तसेच स्थलांतरीत भागात बांधकाम करणे शिल्लक आहेत. ज्यामध्ये काही झोपडपटी भागात इतर डिपीआर मधून घरकुले स्थलांतरीत करुन काम करण्याचा समावेश आहे. अशा शिल्लक व लाभार्थी हिस्सा भरणा केलेल्या एकूण १२६० लाभार्थ्यानी लाभार्थी हिस्सा भरणा केलेल्या पावतीसह घरकुलासाठी अर्ज सादर केल्यानुसार सर्वेक्षणाअंती १०४३ लाभार्थी पात्र आढळून आले अशा पात्र लाभार्थी हिस्सा रक्कम भरणा केलेल्या व मंजुर यादी मधील इच्छूक लाभार्थ्याची घरकुले चालू करणे आवश्यक आहे. तसेच काम चालू करण्यापुर्वी लाभार्थ्याकड्डून पुर्ण लाभार्थी हिस्सा भरणा करुनच कामास सुरुवात

करणे आवश्यक आहे. करीता सदरील काम इतर इच्छुक कत्रांटदार यांचेकडून मूळ मंजुर निविदा दरावर निविदा प्रक्रिया न करता करुन घेण्यासाठी मान्यता देण्याचा प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्यात आलेला आहे.स्थायी समितीने या प्रस्तावास मान्यता दिली तर कामास गती येइ्ल.

**नवलकुमार पोकर्णा** आण्णाभाऊ साठे पुतळा ते आयटिआय रस्त्यावर व आण्णाभाऊ साठे चौकात जागोजागी खडे पडलेले असून सदरील रस्त्याची चौकाची दुरुस्ती तातडीने करणे आवश्यक आहे. सदरील रस्ता हा सार्वजनिक बांधकाम विभागाचा असल्यामूळे त्यांचेकडून या रस्त्याची दुरुस्ती होत नाही त्यामूळे महानगरपालिकेने सदरील रस्ता हस्तांतरीत करुन घेवून रस्त्याची दुरुस्ती त्वरीत करावी

**गंगासागर आन्नेवार** तरोडा भागातील मालेगांव रस्त्याच्या दोन्ही साईडने नाल्याचे बांधकाम बंद पडलेले आहे ते काम त्वरीत सुरु करुन पुर्ण करण्यात यावे अशी आमची मागणी आहे.

**विषय क्र. १**

महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्र.निमवा-२०१३/प्र.क्र.१८/सेवा-९ दि.८ ऑक्टोबर २०१३ व नुसार नांवामनपा आदेश क्र.नांवामनपा/लेवि/१८३६१/१३दि.९.ऑक्टोबर २०१३ अन्वये महानगरपालिकेतील कार्यरत वेतनधारकांना दि.१ ऑक्टोबर २०१३ पासून मूळ वेतन व ग्रेड पे यावर ९०% या दराने महागाई भत्ता मंजूर करण्यात आला त्यास कार्योत्तर प्रशासकीयव आर्थिक मन्यता देणे बाबत

**महापौर** कार्योत्तर मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.१५०** **ठराव**

महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्र.निमवा-२०१३/प्र.क्र.१८/सेवा-९ दि.८ ऑक्टोबर २०१३ व नुसार नांवामनपा आदेश क्र. नांवामनपा/लेवि/१८३६१/१३दि.९.ऑक्टोबर २०१३ अन्वये महानगरपालिकेतील कार्यरत वेतनधारकांना दि.१ ऑक्टोबर २०१३ पासून मूळ वेतन व ग्रेड पे यावर ९०% या दराने महागाई भत्ता मंजूर करण्यात आला त्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते कार्योत्तर प्रशासकीयव आर्थिक देते.

**विषय क्र.२:-**

नांवामनपा आदेश क्र.ले.वि/सेनि/१८७१९/२०१३ दि.३० ऑक्टोबर२०१३ अन्वये मनपा असूधारीत वेतनश्रेणीत निवृत्ती वेतन/कुटुंब निवृती वेतन घेणाऱ्या निवृत्ती वेतन/कुटुंब निवृत्ती वेतनधारकांना त्याच्या मूळ निवृत्ती वेतन/कुटुंब निवृती आणि महागाई वेतन/महागाई कुटुंब निवृत्ती वेतन (असल्यास) त्यांच्या एकूण रक्कमेवर दि.१ जानेवारी २०१३ पासून १५१ टक्के वरुन १६६ टक्के यादराने महागाई भत्ता देण्यास मंजुरी देण्यात आली त्यास कार्योत्तर प्रशासकीयव आर्थिक मान्यता देणे बाबत

**महापौर** कार्योत्तर मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.१५१** **ठराव**

नांवामनपा आदेश क्र.ले.वि/सेनि/१८७१९/२०१३ दि.३० ऑक्टोबर२०१३ अन्वये मनपा असूधारीत वेतनश्रेणीत निवृत्ती वेतन/कुटुंब निवृती वेतन घेणाऱ्या निवृत्ती वेतन/कुटुंब निवृत्ती वेतनधारकांना त्याच्या मूळ निवृत्ती वेतन/कुटुंब निवृती आणि महागाई वेतन/महागाई कुटुंब निवृत्ती वेतन (असल्यास) त्यांच्या एकूण रक्कमेवर दि.१ जानेवारी २०१३ पासून१५१ टक्के वरुन १६६ टक्के यादराने महागाई भत्ता देण्यास मंजुरी देण्यात आली त्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते कार्योत्तर प्रशासकीयव आर्थिक देते.

**विषय क्र.३**

महाराष्ट्र शासन वित्तविभाग निर्णय क्र.निमवा-२०१३/प्र.क्र.७७/सेवा-४ दि.९ औक्टोबर २२०१३ चे निर्णयानूसार निवृत्ती वेतन/कुटुंब निवृत्ती वेतन धारक यांचे दि.१ १ऑक्टोबर २०१३ पासून दरमहा ९० टक्के यादराने महागाई भत्ता वाढ करण्यात आली असून त्यानूसार मनपा निवृत्ती वेतन/कुटुंब निवृत्ती वेतन धारकांना त्यांच्या मूळ निवृत्त वेतन/कुटूंब निवृत्ती आणि महागाई भत्ता/महागाई कुटुब निवृत्ती वेतनावर १ ऑक्टोबर २०१३ पासून महागाई भत्ता ८० टक्केवरुन ९० टक्के दराने रोखीने प्रदान करण्यासाठी आदेश क्र. नांवामना/लेवि/सेनि/१८७२०/२०१३ दि. दि.३० ऑक्टोबर२०१३ अन्वये मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर प्रशासकीयव आर्थिक मन्यता देणे बाबत

**महापौर** कार्योत्तर मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.१५२** **ठराव**

महाराष्ट्र शासन वित्तविभाग निर्णय क्र.निमवा-२०१३/प्र.क्र.७७/सेवा-४ दि.९ औक्टोबर २२०१३ चे निर्णयानूसार निवृत्ती वेतन/कुटुंब निवृत्ती वेतन धारक यांचे दि.१ १ऑक्टोबर २०१३ पासून दरमहा ९० टक्के यादराने महागाई भत्ता वाढ करण्यात आली असून त्यानूसार मनपा निवृत्ती वेतन/कुटुंब निवृत्ती वेतन धारकांना त्यांच्या मूळ निवृत्त वेतन/कुटूंब निवृत्ती आणि महागाई भत्ता/महागाई कुटुब निवृत्ती वेतनावर १ ऑक्टोबर २०१३ पासून महागाई भत्ता ८० टक्केवरुन ९० टक्के दराने रोखीने प्रदान

करण्यासाठी आदेश क्र. नांवामना/लेवि/सेनि/१८७२०/२०१३ दि. दि.३० ऑक्टोबर २०१३ अन्वये मान्यता देण्यात आली त्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक देते.

**विषय क्र.४**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवर श्री व्ही. जी. झंवर, सेवानिवृत्त अधिक्षक अभियंता यांची कार्यालयीन आदेश क्रं.नांवाशमनपा/साप्रवि/७३७/१० दि.२२.०४.२०१० अन्वये प्रतिमहा पारिश्रामीकावर प्रथम सहा
महिण्यांकरिता मनपाकेतील पाणी पुरवठा व मलनिःस्सारण विभागाकडील JNNURM अंतर्गत कामाचा निपटारा करण्यासाठी विशेष कार्याधिकारी म्हणुन नेमणुक करण्यात आली होती. तद्नंतर संबंधितास मनपा सर्व साधारण सभेच्या मान्यतेनुसार वेळोवेळी प्रतिमहा परिश्रमिकावरील सेवेत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

यापुर्वी संबंधितांच्या प्रतिमहा परिश्रमिकावरील सेवा कालावधीची मुदत दि.०२.०५.२०१३ रोजी संपलेली असल्याने त्यांचे सेवेत दि.०३.०५.२०१३ रोजीचा एका दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.०४.०५.२०१३ पासुन पुढील एका वर्षाकरीता कार्यालयीन आदेश क्रं.मनपा/साप्रवि/आस्था-१/४६४७/१० दि.०८.०९.२०१० अन्वये ठरविण्यात आलेल्या प्रतिमहा परिश्रमिक मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात मुदतवाढ देण्यासाठी महापालिका सर्वसरधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला असता माहपालिका सर्वसाधारण सभेने दि.३१.०८.२०१३ रोजी संमत केलेला ठराव क्रं.१११ अन्वये श्री व्हि.जी. झंवर यांची महापालिकेतील सेवा त्यांची मुदत संपलेली तारीख म्हणजे दि.०२.०५.२०१३ पासुन कमी करण्यास मान्यता दिली आहे.

पाणी पुरवठा विभागाने मागील ०५ वर्षात पाणी पुरवठा व मलनिःस्सारणाची जवळपास ३०० कोटींची काम पुर्ण केली असुन आता ही सर्व योजना मुळ व्यवस्थेशी संलग्नित करून पुर्ण कार्यक्षमतेने चालु करणे आवश्यक आहे. पाणी पुरवठा व मलनिःस्सारण विभागाकरीता कार्यकारी अभियंता नसुन त्या पदाचा अतिरीक्त पदभार श्री एस.डी.जाधव, उप अभियंता यांचेकडे सोपविण्यात आला आहे, श्री व्हि.जी.झंवर हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणे विभागाचे सेवानिवृत्त अधिक्षक अभियंता असुन त्यांनी पुर्वी महानगरपालिकेत उप अभियंता व कार्यकारी अभियंता म्हणून काम केलेले आहे. त्यांचे तांत्रिक ज्ञान व अनुभव विचारात घेता त्यांची सेवा महानगरपालिकेच्या हिताची आहे. करीता संबंधितांच्या सेवा कालावधीची मुदत दि.०२.०५.२०१३ रोजी संपलेली असल्याने त्यांचे सेवेत दि.०३.०५.२०१३ रोजीचा एका दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.०४.०५.२०१३ पासुन पुढील एका वर्षाकरीता दि.०८.०९.२०१० रोजीच्या आदेशान्वये ठरविलेल्या प्रतिमहा परिश्रमिक मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात मुदतवाढ देण्यास पुनश्च महापालिका सर्वसाधारण सभेस विनंती करण्यात येते.

**डॉ.करुणा जमदाडे** श्री झंवर सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता यांना त्यांचे तांत्रिक ज्ञान व अनुभव विचारात घेता सन २०१० पासून ते २०१३ पर्यत परिश्रमिक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात घेण्यात आलेले आहे अधिका-याची काम करण्याची क्षमता वयाची ५८ वर्षापर्यतच असल्यामूळे सेवानिवृत्तीचे वय ५८ केलेले आहे.असे असतांना त्यांना अजून किती वर्ष त्यांना मुदतवाढ देण्यात येणार आहे. अनेक सुशिक्षित बेकार हुशार स्थापत्य अभियंते आहेत त्यांची नेमणूक करण्यात यावी. जेण् करुन कामाची कार्यक्ष मता वाढवून नागरीकांना चांगली सुविधा मिळू शकेल.

**उपआयुक्त (पापूवि)** जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत नांदेड शहराकरीता सुधारीत पाणी पुरवठा कार्यान्वीत करण्यात आलेली आहे तसेच दक्षिण नांदेड सिडके हडको,तरोडा या भागाकरीताही सुधारीत पाणी पुरवठा योजने काम चालू आहे.ही कामे सुरळीत पुर्ण करण्यासाठी अनुभवी अभियंत्याची आवश्यकता आहे.नांदेड शहरात सन १९२५,१९४०,१९६६ व १९७० ला पाणी पुरवठा मलनिस्सारण लाईनी टाकण्यात आलेल्या असून या टाकण्यात आलेल्या लाईनचे नकाशे उपलब्ध्द नसल्यामूळे या लाईन दुरुस्ती करण्यासाठी अडचणी येत आहेत. श्री झंवर यांनी अनेक वर्ष पाणी पुरवठा व मलनिस्सारण विभागातील काम केलेले असल्यामूळे त्यांना या टाकण्यात आलेल्या लाईनची पुर्ण माहिती आहे.महानगरपालिकेकडे जे उपअभियंते. कार्य अभियंते असून त्यांना पुरेंसा अनुभव नाही त्यामूळे श्री झंवर याचे तांत्रिक मार्गदर्शनाची अनुभवाची महानगरपालिकेस नितांत आवश्यकता आहे.

**बालासाहेब तरोडेकर** श्री झंवर यांना तांत्रिक ज्ञान व अनुभव दांडगा असल्यामूळे त्यांचे सेवेची नितांत आवश्यक असल्याचे म्हटलेले आहे पंरतु जेएनएनयूआरएम योजने अंतर्गत नांदेड शहरात रिजनल वर्कशॉप ते आय.टि.आय. ते शिवाजीनगर,मुथा चौक ते जुना मोंढा ते हबीब टॉकीज या भागात ज्या नविन पाणी पुरवठा लाईन मलनिस्सारण लाईनी टाकलेले आहे त्या लाईनव्दारे पाण्याचा मलनिस्साणाचा निचरा होतो काय हे आम्हाला दाखववे .पुर्ण लाईनी खाली वर टाकण्यात आलेल्या असल्यामूळे लाईन लिकेज होत आहे त्यांचे अनूभवाचा तांत्रिक ज्ञानाचा महानगरपालिकेस कुठे फायदा झाला हे दाखवा.त्यामूळे पुर्वीचा ठराव कायम ठेवा वा

**सुंदरलाल गुरुखुदे** श्री झंवर यांचे मार्गदर्शना खाली जेएनएनयूआरएम योजने अंतर्गत पाणी पुरवठा व मलनिस्सारणाची जवळपास ३०० कोटीची कामे करण्यात आल्याचे सांगण्यात येते ही कामे खरोखरच चांगली झालेली

आहे काय, चढ उतार न पाहता पाईप लाईन टाकण्यात आल्यामूळे या पाईप लाईन व्दारे पाण्याचा निचरा होत नाही.श्री बाळासाहेब तरोडेकर यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** स.सदस्यांनी आपली बाजू मांडली आहे.याप्रकरणी अभ्यास करुन प्रस्तावावर निर्णय घेण्यासाठी महापौराना अधिकार देण्यात यावेत.

**सरजितसिंघ गिल** श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी सुचिल्यानुसार प्रस्तावावर निर्णय घेण्यात येईल. हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१५३** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवर श्री व्ही. जी. झंवर, सेवानिवृत्त अधिक्षक अभियंता यांना प्रस्तावित केल्यानुसार परिश्रमिक मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात मुदतवाढ देण्याच्या संदर्भात महापौरं, नांवामनपा यांना योग्य तो अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते. हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.५**

मा.अतिरिक्त संचालक यांचे पत्र क्र.राकुकका/अर्बनआरसीएच/कक्ष-७/२०१३ दि.५.१०.२०१३ च्या पत्राचे कृपया अवलोकन होवून सदरील पत्रान्वये अर्बन आर.सी.एच.पी.आय.पी. २०१३.२०१४ अंतर्गत मंजुर असलेले अधिकारी /कर्मचारी यांचे पदे भरण्यासाठी मार्गदर्शन केले आहे.

त्या अनुषंगाने नांवामनपा एकात्मीक आरोग्य व कुटूंब कल्याण समिती नांदेड अंतर्गत एक अकाऊटंट कम डाटा एन्ट्री ऑपरेटर हे पद मान्य आहे.सदरील पदासाठी लागणारी शैक्षणिक अर्हता मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदवी (वाणिज्य पदवीकाधारकास प्राधान्य) Tally ERP ९ Customize version ,संगणक विषयाचे कुशल ज्ञान, एम.एस.सी.आय.टी,मराठी टाईपिंग ३० श.प्र.मि.व इंग्रजी टाईपिंग ४० श.प्र.मि.सदरील पदासाठी रु.८,०००/- एवढे मानधन प्रतिमहा देय असून हे मानधन महानगरपालिकेच्या २०१३.२०१४ च्या निधीमधून द्यावयाचे आहे.

करीता सदरील शैक्षणिक अर्हता धारण करत असलेल्या उमेदवारास घेण्यासाठी प्रस्ताव सादर.

**स.शेर अली** महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती खराब आहे या योजने अंतर्गत शासनाकडून अनुदान प्राप्त झाल्यानंतरच नेमणूका करण्यात याव्यात.

**आयुक्त** शासनाची योजना असुन या योजने अंतर्गत शासनाकडून अनुदान मंजुर आहे.

**महापौर** आयुक्तांचे प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र.१५४** **ठराव**

नांवामनपा एकात्मीक आरोग्य व कुटूंब कल्याण समिती नांदेड अंतर्गत एक अकाऊटंट कम डाटा एन्ट्री ऑपरेटर हे पद मान्य असून .सदरील पदासाठी लागणारी शैक्षणिक अर्हता मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदवी (वाणिज्य पदवीकाधारकास प्राधान्य) Tally ERP ९ Customize version,संगणक विषयाचे कुशल ज्ञान, एम.एस.सी.आय.टी, मराठी टाईपिंग ३० श.प्र.मि.व इंग्रजी टाईपिंग ४० श.प्र.मि.अशी निश्चित करण्यात आलेली असून सदरील पदासाठी रु.८,०००/- एवढे मानधन प्रतिमहा देय आहे. करीता नांवामनपा एकात्मीक आरोग्य व कुटूंब कल्याण समिती नांदेड अंतर्गत उपरोक्त शैक्षणिक अर्हता धारण करत असलेल्या उमेदवाराची नियमानूसार अकाऊटंट कम डाटा एन्ट्री ऑपरेटरची नेमणूक करण्यास नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.व मानधनावर लागणा-या खर्चास सन २०१३-२०१४ च्या अदाजपत्रकातील सबंधित शिर्षकातून प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.६**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस रु.७५ लक्षाचे अनुदान या अभियान अंतर्गत दलितेतर वस्त्यामध्ये सुधारणासाठी मा.जिल्हाधिकारी यांच्या पत्र दि.१७.१.२०१२ च्या पत्रान्वये मंजुर आहे या शिर्षाखाली मनपाने आतापर्यत खालील दोन कामांचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केला असून ती मंजुर आहेत.व प्रत्यक्ष कामास सुरवात होईल.

१) रेल्वे स्टेशन जवळील जूने (सन १९३६) चे जलकुंभ पाडून नविन जलकुंभ बांधणे (रु.६२.६९ लक्ष)

२) रेल्वे स्टेशनजवळील जलकुंभ परिसरातील इनलेट, आऊटलेट वितरण पाईप लाईन बदलणे (रु.२०.८० लक्ष)

मंजुर रु.७५ लक्ष अनुदानापैकी उपरोक्त दोन कामासाठी ५०% म्हणजे रु.४१.७४६ लक्ष एवढे अनुदान प्राप्त असून रु.३३.२५३ लक्ष एवढे अनुदान शिल्लक आहे. या शिल्लक अनुदानातून दोन कामे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

१) शक्तीनगर जलकुंभशी संलग्न वितरण व्यवस्थेचे झोनीग करण्यासाठी पाईप लाईन व संबंधित कामे रु.५४.५३ लक्ष

२) किल्ला येथील जूना (सन १९३६) चे जलकुंभ पाडून त्याऐवजी नविन जलकुंभ बांधला जाणार आहे. त्यासाठी इनलेट,आऊटलेट वितरण पाईप लाईन व व्हॉल्वची कामे (रु.१०.१८ लक्ष)

उपरोक्त दोन्ही कामे आवश्यक असून लवकर हाती घेणे आवश्यक आहे.सदर कामे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत नागरी दलितेतर वस्त्यामध्ये सुधारण कार्यक्रम खाली घेण्यासाठी महानगरपालिका सभेची प्रशासकीय व आर्थिक मान्यतेकरीता प्रस्ताव येत्या सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेकरीता सादर .तसेच उपरोक्त कामांना अंदाजित किंमतीच्या ५०% अनुदान महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत नागरी दलितेतर योजने अंतर्गत प्राप्त होणार आहे.त्यामूळे अनुदाना पेक्षा जास्त होणारा खर्च महानगरपालिकेच्या निधीतून करण्यासाठी प्रशासकीय व आर्थिक मान्यतेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभे समोर सादर .

**स.जानी** नगरोत्थान योजने अंतर्गत आय.टि.आय. ते पावडेवाडे वाडी नाका यारस्याचे काम अनेक दिवसापासून बंद आहे या रस्त्याचे काम केंव्हा पुर्ण होणार आहे याचा खुलासा करण्यात यावा.

**फारुख अली खॉ** नगरोत्थान योजने अंतर्गत दोन वर्षापुर्वी शहरातील खोजा कॉलनी,फायर ब्रिगेड ते पावडेवाडी नाका, ईदगाह,मॅफको असे काहीमुख्य रस्त्याची कामे करण्यासाठी कंत्राटदारास आदेश दिलेले आहे.कंत्राटदाराने हे सर्व रस्ते खोदून ठेवलेली आहेत परंतु निधी नसल्यामूळे यारस्त्याची कामे दोन वर्षापासून बंद आहेत अर्धवट रस्त्यामूळे नागरीकांना वाहनांना खुप त्रास होत आहे.स्थायी समितीच्या सभेमध्ये सुध्दा आम्ही अनेकदा यावर चर्चा केलेली आहे. लवकरात लवकर सदरील रस्त्याची कामे पुर्ण करण्यात यावीत जेणें करुन नागरीकांना दिलासा मिळेल.

**स.शेर अली** नगरोत्थान योजने अंतर्गत हाती घेतलेली रस्त्याची कामे निधी अभावी बंद पडलेली आहे. त्यामूळे सदरील रस्त्याची कामे कर्ज काढून पुर्ण करण्याचा निर्णय मागील सभेत घेण्यात आलेला आहे. फायर ब्रिगेड ते पावडेवाडी नाका रस्त्याच्याही या प्रस्तावात समावेश करण्यात यावा.लवकरात लवकर कर्ज घेवून अर्धवट रस्त्याची सर्व कामे पुर्ण करण्यात यावी.

**रामनारायणजी काबरा** महानगरपालिका हध्दीत नव्याने विकसित होणा-या विविध भागात पाणी पुरवठा, रस्ते, नाल्या, विद्युत व्यवस्था ई.नागरी सुविधा उपलब्ध्द करुन देण्यासाठी डि.पी.प्लॅन तयार करावयास पाहिजे व जसा जसा निधी उपलब्ध्द होईल त्याप्रमाणे त्या भागात विकासाची कामे करावयास पाहिजे. आपण प्रत्येक वेळी कर्ज घेवूनच विकासाची कामे करणार आहोत काय आणि हे कर्ज कसे फेडावयाचे, कर्ज घेण्यासही काही मर्यादा आहे.त्यामूळे महानगपालिकेचे उत्पन्न कसे वाढवावयाचे याचा विचार करणे आवश्यक आहे,शहराचा विस्तार झपाटयाने होत आहे.या विस्तारीत भागात विकासाची कामे करण्यासाठी महानगरपालिकेचा रेव्हीन्यु वाढवावयाचा प्रयत्न झाला पाहिजे.

**फारुख अली खॉ** दोन वर्षापासून रस्त्याची कामे बंद असून दोन वर्षापुवीच्या दराने कंत्राटदार आज काम करण्यास तयार होतील काय हाही प्रश्न आहे. महानगरपालिका विविध कामासाठी कोटयावधी रुपयाचे कर्ज घेत आहेत रंतु हे घेतलेले कर्ज महानगरपालिका फेडू शकेल काय याचाही विचार होणे आवश्यक आहे.

**स.शेर अली** अनुभवी व जेष्ठ स. सदस्यांनी महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्यासाठी सुचना कराव्यात त्यावर महानगरपालिका निर्णय घेईल.

**महापौर** यावर्षीच्या एलबीटी पासून ७५ कोटीचे उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले होते परंतू आज पर्यत प्रत्यक्षात ४३ टक्केच उत्पन्न झालेले आहे मागील वर्षापेक्षा या वर्षी एलबीटीच्या उत्पन्नात घट झालेली आहे इतर महानगरपालिकेत एलबीटीच्या उत्पन्नात वाढ झालेली आहे आपल्या महानगरपालिकेत उत्पन्नात घट होत आहे याची कारणे आयुक्तांनी शोधावी. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी उपाय योजना करण्याकरीता महानगरपालिकेची लवकरच विशेष सभा बोलाविण्यात येइ्ल.आर्थिक परिस्थीती खराब असल्यामूळे कर्मचा-यांना दोन दोन महिणे पगार होत नाही

**अंजली गायकवाड** प्रस्तावात दलितेतर वस्त्यामध्ये सुधारणा असे म्हटलेले आहे.याचा अर्थ काय आहे ते आम्हाला समजावून सांगावे.

**उपआयुक्त पापुवि** शासनाच्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान दलितेतर वस्त्यामध्ये सुधारणा कार्यक्रम आणि दलित वस्ती सुधारणा कार्यक्रम अशा दोन प्रकारच्या योजना आहेत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत दलितेतर वस्त्यामध्ये सुधारणासाठी महानगरपालिकेस रु.७५ लक्षाचे अनुदान मजुर असून शिल्लक अनुदानातून शक्तीनगर जलकुंभशी संलग्न वितरण व्यवस्थेचे झोनीग करण्यासाठी पाईप लाईन व संबंधित कामे रु.५४.५३ लक्ष व किल्ला येथील जूना (सन १९३६) चे जलकुंभ पाडून त्याऐवजी नविन जलकुंभ बांधला जाणार आहे. त्यासाठी इनलेट,आऊटलेट वितरण पाईप लाईन व व्हॉल्वची कामे (रु.१०.१८ लक्ष) ची कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहे ही दोन कामे पुर्ण

झाल्यानंतर व झोनिंग केल्यानंतर किल्ला,हैदरबाग,चौफाळा पाण्याच्या टाकीतून शक्तीनगर व इतर परिसरासाठी होणारा पाणी पुरवठा बंद होइ्ल यामूळे पाण्याचे प्रेशरमध्ये वाढ होइ्ल.

**सरजितसिंध गिल** सुधारीत पा.पु.योजन भगतसिंघ रोडचा भाग सुटलेले आहे त्यामूळे याभागात पाणी पुरवठा होण्यासाठी शक्तीनगर जलकुंभशी संलग्न वितरण व्यवस्थेचे झोनीग करण्यासाठी पाईप लाईन व संबंधित कामाचा प्रस्ताव प्रशासनाने दिलेला आहे तरी या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.या दोन कामामूळे हैदरबाग,किल्ला,चौफाळा या भागात पाणी पुरवठा पुरशा दाबाने होइल. तसेच भगतसिंङा रोड कॉर्नर पासून ते गोविंद भाग कॉर्नर पर्यत पाईप लाईन टाकण्यात यावी तसेच साईनगर भागातील पाईप लाईन टाकण्यात यावी यासाठी लागणारा खर्च अंदाजे १५ लक्षाची मनपा निधीतून प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात यावी.

**विरेंद्रसिंङा गाडीवाले** या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** श्री सरजितसिंध गिल यानी मांडलेल्या प्रस्तावासह प्रशासनाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेंत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१५५** **ठराव**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस या अभियान अंतर्गत दलितेतर वस्त्यामध्ये सुधारणा कार्यक्रमा अंतर्गत मंजुर रु.७५ लक्ष अनुदानापैकी १) रेल्वे स्टेशन जवळील जूने (सन १९३६) चे जलकुंभ पाडून नविन जलकुंभ बांधणे (रु.६२.६९ लक्ष) व २) रेल्वे स्टेशनजवळील जलकुंभ परिसरातील इनलेट,आऊटलेट वितरण पाईप लाईन बदलणे (रु.२०.८० लक्ष) या प्रमाणे या दोन कामासाठी ५०% म्हणजे रु.४१.७४६ लक्ष एवढे अनुदान प्राप्त असून रु.३३.२५३ लक्ष एवढे अनुदान शिल्लक आहे. या शिल्लक अनुदानातून १) शक्तीनगर जलकुंभशी संलग्न वितरण व्यवस्थेचे झोनीग करण्यासाठी पाईप लाईन व संबंधित कामे रु.५४.५३ लक्ष

२) किल्ला येथील जूना (सन १९३६) चे जलकुंभ पाडून त्याऐवजी नविन जलकुंभ बांधला जाणार असल्यामूळे त्यासाठी इनलेट,आऊटलेट वितरण पाईप लाईन व व्हॉल्वची कामे (रु.१०.१८ लक्ष) अशी ही दोन कामे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत नागरी दलितेतर वस्त्यामध्ये सुधारण कार्यक्रम खाली घेण्यासाठी प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते, तसेच सदर कामांना अंदाजित किंमतीच्या ५०% अनुदान महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत नागरी दलितेतर योजने अंतर्गत प्राप्त होणार असल्यामूळे अनुदाना पेक्षा जास्त होणारा खर्च महानगरपालिकेच्या निधीतून करण्याचीही प्रशासकीय व आर्थिक हि नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते. तसेच भगतसिंघ रोड कॉर्नर पासून ते गोविंदबाग कॉर्नर पर्यत व साईनगर भागात ६ इंची पाईप लाईन अंदाजे ३०० मिटर पाईप लाईन टाकण्यासाठी लागणारा अंदाजित खर्च रु.१५.०० लक्षाची प्रशासकीय व आर्थिक मान्यता मनपा निधीतून ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेंत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.७** **प्रस्ताव**

प्रभाग क्रमांक ४० हा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा शेवटचा प्रभाग आहे. प्रभागातील नागरिकांना नांदेड शहरात दररोज नोकरीसाठी, व्यापारासाठी छोटे छोटे उद्योगधंदे, कॉलेज, दवाखाना इ. कामासाठी ये-जा करण्यासाठी शहरबस वाहतुकीची सोय आहे. शहरबसचा शेवटचा स्टॉप म्हणून हडको बसस्टॉप हा पॉईंट आहे. परंतु प्रभागात हडको बसस्टॉपपासून पुढे कमीत कमी अडीच ते तीन किमी अंतराने जे२ जे३ , शाहुनगर, बँक कॉलनी, लहुजी नगर, नीरा नगर, लुंबीनी नगर आणि सर्वात शेवटी राहुल नगर व आश्रम शाळा हया वस्त्या आहेत. सदर वस्तीतील नागरिकांना नांदेड शहरात ये-जा करण्यासाठी शहर बस या वाहनाशिवाय दुसरी कुठलीही सोयीची सुविधा नाही सदर वस्तीचा भाग मागील १५ वर्षांपासून महानगरपालिकेत आहे. बसचा प्रवास करण्याकरिता लोकांना हडको बसस्टॉपपर्यंत पायी चालत यावे लागते. वयोवृद्ध महिला, गर्भवती महिला, लहान बालक, आजारी रूग्ण इ. अतिशय त्रास होतो. त्यातल्या त्यात पहाटे रेल्वेचा प्रवास करण्याकरिता सकाळी ५ वा. हायकोर्ट (मराठवाडा एक्सप्रेस), बैंगलोर एक्सप्रेस इ. रेल्वेचा प्रवास करण्याकरिता खुपच त्रासाचे व जोखमीचे आहे. पाणी पाऊस अंधारी रात्र इ. बाबीचा विचार केल्यास नागरिकांना अतिशय गैरसोयीचे होत आहे. तेव्हा मा. सभागृहास विनंती करण्यात येते की, नागरिकांना त्रास होऊ नये म्हणून शहरबस प्रवासाचा टप्पा हडको बसस्टॉपच्या पुढे होमियोपॅथिक कॉलेज, जे२ जे३, शाहुनगर (गोपाळ चावडी कमान), बँक कॉलनी, वाघाळा, व शेवटी राहुलनगर इथपर्यंत वाहतुक मार्ग वाढवून घेण्यास एस. टी. महामंडळास विनंती करण्यासाठी सभागृह प्रस्तावास मान्यता देते.

**सुचक** :- डॉ,करुणा जमदाडे **अनुमोदक** :- रजिया बेगम

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते. विभाग नियत्रक ,महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नांदेड यांना प्रस्ताव सादर करण्यात येईल.

**ठराव क्र.१५६** **ठराव**

प्रभाग क्रमांक ४० हा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा शेवटचा प्रभाग आहे. प्रभागातील नागरिकांना नांदेड शहरात दररोज नोकरीसाठी, व्यापारासाठी छोटे छोटे उद्योगधंदे, कॉलेज, दवाखाना इ. कामासाठी ये-जा करण्यासाठी शहरबस वाहतुकीची सोय आहे. शहरबसचा शेवटचा स्टॉप म्हणून हडको बसस्टॉप हा पॉईंट आहे. परंतु प्रभागात हडको बसस्टॉपपासून पुढे कमीत कमी अडीच ते तीन किमी अंतराने जे२ जे३ , शाहुनगर, बँक कॉलनी, लहुजी नगर, नीरा नगर, लुंबीनी नगर आणि सर्वात शेवटी राहुल

नगर व आश्रम शाळा हया वस्त्या आहेत. सदर वस्तीतील नागरिकांना नांदेड शहरात ये-जा करण्यासाठी शहर बस या वाहनाशिवाय दुसरी कुठलीही सोयीची सुविधा नाही सदर वस्तीचा भाग मागील १५ वर्षांपासून महानगरपालिकेत आहे. बसचा प्रवास करण्याकरिता लोकांना हडको बसस्टॉपपर्यंत पायी चालत यावे लागते. वयोवृद्ध महिला, गर्भवती महिला, लहान बालक, आजारी रूग्ण इ. अतिशय त्रास होतो. त्यातल्या त्यात पहाटे रेल्वेचा प्रवास करण्याकरिता सकाळी ५ वा. हायकोर्ट (मराठवाडा एक्सप्रेस), बैंगलोर एक्सप्रेस इ. रेल्वेचा प्रवास करण्याकरिता खुपच त्रासाचे व जोखमीचे आहे. पाणी पाऊस अंधारी रात्र इ. बाबीचा विचार केल्यास नागरिकांना अतिशय गैरसोयीचे होत आहे. तेव्हा मा. सभागृहास विनंती करण्यात येते की, नागरिकांना त्रास होऊ नये म्हणून शहर बस प्रवासाचा टप्पा हडको बसस्टॉपच्या पुढे होमियोपॅथिक कॉलेज, जे२ जे३, शाहुनगर (गोपाळ चावडी कमान), बँक कॉलनी, वाघाळा, व शेवटी राहुलनगर इथपर्यंत वाहतुक मार्ग वाढविण्यासाठी विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नांदेड यांना ही नावामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते शिफारस करते.

**विषय क्र. ८** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत किती मोबाईल टॉवरांना ना हरकत प्रमाणपत्र (NOC) प्रदान करण्यात आलेली आहे. नाहरकत प्रमाणपत्रासाठी कोणते कागदपत्र घेण्यात आले. तसेच मोबईल टॉवरांना महापालिकेने किती कर लावलेले आहेत व कोणत्या आधारे कर आकारण्यात आलेले आहे. शासनाची बंदी असतांनाही शाळेवर व दवाखान्यावर मोबाईल टॉवर उभे आहेत. शाळकरी मुले व दवाखान्याच्या रुग्णाचे जिवास धोका निर्माण

झालेले आहेत. शाळेवर व दवाखान्यावर मोबाईल टॉवर आहेत, ते ताबडतोब काढण्यात येऊन मोबाईल टॉवर धारकांवर पोलीस कार्यवाही करण्यात यावी तसेच नाहरकत प्रमाणपत्र न घेतलेल्या टॉवरांना सील करणे करीता ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येते.

**सुचक :** सरजितसिंघ गिल **अनुमोदक :** इशरत फातेमा

**<u>प्रशासकीय टिप्पणी</u>**

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. टीपी.एस.३०३३/१७२३/CR/३९४/०३ UD-३० दिनांक ४-०७-२००५ अन्वये मोबाईल टॉवरला परवानगी देणेसाठी विकास शुल्काची आकारणी करून भरणा करणे बाबत सुचना देण्यात आल्या होत्या.

तथापी मोबाईल टॉवर कंपन्यांनी शासन निर्णयाचे व विकास शुल्क भरण्या बाबतच्या सुचने विरूध्द मा. मुंबई उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल केले. या रिट पिटीशनचा निकाल लागला असुन त्याप्रमाणे उपरोक्त शासन निर्णयान्वये प्रिमियम भरणे बाबतचे सुचनेस मा. उच्च न्यायालयाने Quashed and Setaside ठरविले आहे. महानगरपालिकेस उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाही न करण्याचे निर्देश दिले आहे. तसेच बांधकाम आणि विकासा संबंधी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ अंतर्गत कायद्यात जी काही तरतुद आहे ती व विविध महानगरपालिकेस जे काही कायदे लागु आहेत त्यानुसार त्यांना कायदेशीर कार्यवाही करता येईल असा निर्णय मा.उच्च न्यायालयाने दिलेला आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत विविध कंपन्यांनी त्यांचे मोबाईल टॉवर अनाधिकृत रित्या उभे केलेले आहेत. सदर टॉवर अनाधिकृतरित्या उभ्या असल्याने महानगरपालिकेचा विकास शुल्क बुडत आहे. तसेच लोकांचे स्वास्थ व सुरक्षिततेचा मुद्दा देखील आहे. तरी वरील प्रमाणे मा. उच्च न्यायालयाचा निर्णयानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ अन्वये विकास परवानगी बंधनकारक आहे तसेच इतर महानगरपालिकेच्या नियमावलीचा विचार करता त्यांनी अवलंबिलेल्या धोरणानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नव्याने मोबाईल टॉवर परवानगी करीता नियमावली तयार करत आहे.

मनपा ठराव क्र. ९७ दि. ३०.११.२००९ नुसार शुल्का बाबत खालील प्रमाणे ठराव पास झालेला आहे. तरी सद्यस्थितीत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत सद्दस्थितीत नांवाशमनपा हध्दीत अधिकृत व अनाधिकृत उभे असलेले मोबाईल टॉवर कंपनीकडुन कायम स्वरूपी ठेव रक्कम रू.१,००,००० व विकास शुल्कापोटी रक्कम रू. २,५०,०००/- इतकी अशी एकुण रू. ३.५० लक्ष प्रती टॉवर भरून घेवुन शासनाच्या पुढील आदेशाच्या अधिन राहुन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते, तसेच उभारण्यात आलेल्या प्रति मोबाईल टॉवरला रू. २४,०००/- प्रती वर्षी अनुज्ञाप्ती शुल्क लावण्याचा असा ठराव झाला आहे. त्या अनुषंगाने मोबाईल कंपनीला विकास शुल्क नोटिस दिली असता कंपन्यांनी हायकोर्टात सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ केले त्यामुळे अद्याप पर्यंत महानगरपालिका विकास शुल्क जमा करू शकला नाही.

a. नगर रचना विभागा मार्फत मागील/चालू वर्षात गुंठेवारी नियमाअंतर्गत नियमित झालेल्या दोन इमारतीवर मोबाईल टॉवरला ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे.
b. शाळेवर/दवाखान्यावर इमारतीवर मोबाईल टावर करीता परवानगी दिलेली नाही.

तरी मोबाईल टॉवरला नाहरकत प्रमाणपत्र देण्याबाबत विधी विभागाचा कायदेशीर सल्ला घेऊन त्यानुसार धोरण निश्चित करणे आवश्यक आहे. करीता सर्वसाधारण सभेच्या माहितीस्तव सादर.

**सरजितसिंघ गिल** दुरध्वनी /मोबाईल टॉवर उभारण्यास परवानगी देण्याचे अधिकार महानगरपालिकेचे आहे.परंतू त्याची अमलबजावणी होत नाही.असे निदर्शनास आले आहे की. शाळा,दवाखाने,मुला मुलीचे वस्तीगृहाच्या इमारतीवर व दाट लोकवस्तीच्या ठिकाणच्या खाजगी मालमतत्तेवर मोबाईल टॉवरची उभारणी करण्यात

आलेली असून या मोबाईल टॉवर मूळे. लहान लहान विद्यार्थ्याच्या आरोग्यावर परिणाम होत आहे.म्हणून शाळा,दवाखाने,वस्तीगृहाच्या इमारतीवर व दाट लोकवस्तीतील खाजगी इमारतीवर मोबाईल टॉवर उभारण्यास परवानगी देण्यात येवू नये.मोबाईल टॉवरची उभारण्यास परवानगी देण्यापूर्वी महासभेची मान्यता घेण्यात यावी असा माझा प्रस्ताव आहे.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** श्री सरजितसिंघ गिल यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझें अनुमोदन आहे.

**अ.हबीब अ.रहिम बागवान** हैदरबाग -२ एखरा उर्दू शाळेच्या इमातीवर मोबाईल टॉवर उभारण्यात आलेले असून या मोबाईल टावर मूळे शाळेतील लहान लहान मुलांना त्रास होत असल्यामूळे हे टॉवर काढून टाकण्यात यावे

**डॉ.ललिता बोकारे शिंदे** मोबाईल टॉवर उभारण्यास परवानगी देण्याबाबत काही नियम केलेले आहे काय .नियम केलेले नसतील तर नियम तयार करण्यासाठी एक उपसमिती कायम करण्यात यावी.

**अल केसरी हसन बिन उबेद** हैदरबाग भागात दाट लोकवस्ती असून शाळेच्या इमारतीवर मोबाईल टॉवरची उभारणी करण्यात आलेली असून लहान लहान मुलांना त्रास होत असल्यामूळे ते टॉवर काढून टाकण्यासाठी लेखी तक्रार करण्यात आलेली आहे परंतु अद्याप टॉवर काढण्यात आलेले नाही.

**नवलकुमार पोकर्णा** माझ्या प्रभागातील तीन शाळेच्या इमारतीवर मोबाईल टॉवर उभारण्यात आलेले असून ते टॉवर काढून टाकण्यासाठी लेखी तक्रार केलेली आहे परंतु ते टॉवर काढून टाकण्यात आलेले नाही. शाळा,दवाखाने ,कॉलेजच्या इमारतीवर मोबाईल टॉवर उभारण्याची परवानगी देण्यात येवू नये.प्रत्येक क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत किती मोबाईल टॉवर उभारण्यात आलेले आहे त्याची यादी तयार करुन स.सदस्यांना देण्यात यावी.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** शाळा व दवाखान्याच्या इमारतीवर मोबाईल टॉवर उभारण्यास परवानगी देण्यात येवू नये कारण मोबाईल टॉवरच्या रेडीएशन लहरीमूळे लहान लहान विद्यार्थ्याच्या आरोग्यावर व रुग्णांवर परिणाम होत आहे.जेएनएयुआरएम योजने अंतर्गत कोटयावधी रुपये खर्च करुन शहरातील मुख्य रस्त्याचे रुंदीकरण व सिमेट क्रॉक्रिटने मजबुतीकरण करण्यात आलेले आहे परंतु विविध मोबाईल कंपन्या मोबाइ्ल केबल लाईन टाकण्यासाठी रस्ते फोडत असल्यामूळे रस्ते पुर्ण खराब होत आहे व ते पुर्वी प्रमाणे रस्ते दुरुस्त होत नाही.रस्ते दुरुस्त केल्यानंतरही जागोजागी पुन्हा खडे पडत आहे रस्त्याचे लेव्हल रहात नाही. म्हणून केंबल लाईन टाकण्यासाठी परवानगी देण्यात येवू नये.

**आयुक्त** प्रस्तावाच्या अनुषंगाने सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. नगररचना विभागा मार्फत शाळा, कॉलेजेस, दवाखान्याच्या इमारतीवर मोबाईल टॉवर उभारण्यास परवानगी देण्यात आलेली नाही. शहरात विविध मोबाईल कंपन्यानी हायकोर्टात प्रकरण न्यायप्रविष्ठ केलेले असून जो पर्यत निकाल लागत नाही तो पर्यत मोबाइ्ल टॉवर काढता येत नाही.विशिष्ट ठिकाणी असलेल्या टॉवरमूळे नागरीकांना त्रास होत असेल तर विशेष बाब म्हणून न्यायालयास विंनती करुन न्यायालयाचे मान्यतेने टॉवर काढता येईल.

**सरजितसिंघ गिल** एमआरटिपी.ॲक्ट नुसार टॉवर उभारण्यास परवानगी देण्याचे अधिकार महानगरपालिकेस आहे त्यामूळे शाळा ,दवाखाने,हॉस्टेल,दाट लोकवस्ती या ठिकाणी मोबाईल टॉवर उभारण्यासाठी परवानगी देण्यात येवू नये. परवानगीसाठी अर्ज आलेला असेल तर त्यास सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून देण्यात यावी. अनाधिकृत कोणी टॉवर उभारण्याचा प्रयत्न करीत असेल तर त्याचे विरुध्द कार्यवाही करण्यात यावी. जेएनएनयूआरएम योजने अंतर्गत शहरातील सर्व रस्त्याचे मजबुतीकरण रुंदीकरण करण्यात आलेले असून विविध कंपन्या मोबाईल केबल टाकण्यासाठी रस्ते फोडीत आहे यामूळे रस्ते खराब होत आहे यापुढे केबल लाईन टाकण्यासाठी रस्ता फोडण्याची परवानगी मागीतली असेल तर त्यास महासभेची मान्यता घेवूनच रस्ते फोडण्याची व केंबल लाईन टाकण्याची परवानगी द्यावी .

**दिपकसिंह रावत** श्री सरजितसिंघ गिल यानी जो प्रस्ताव मांडला आहे त्यास माझे अनुमोदन आहे. मोबाइ्ल टॉवर उभारण्याची व रस्ते फोडण्याची परवानगी ही सर्व साधारण सभेची मान्यता घेवूनच देण्यात यावी.

**स.शेर अली** श्री गिल यांनी मांडलेला प्रस्ताव अत्यंत चांगला आहे त्यास मान्यता देण्यात यावी परंतु महानगरपालिकेस पाणी पुरवठा लाईन व मलनिस्सारण लाईन टाकण्यासाठी वा इतर कामासाठी रस्ता फोडण्याची गरज पडल्यास त्यास महासभेची मान्यतेची आवश्यकता लागणार नाही.

**महापौर** श्री सरजितसिंघ गिल यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव क्र.१५७** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत विविध मोंबाईल कंपन्यांनी  व टेलिफोन निगमने मोबाइल टॉवर उभारण्याची परवानगी मागीतली असेल तसेच नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत विविध मोंबाईल कंपन्यांनी व टेलिफोन निगमने भूमिगत केंबल वायर  टाकणसाठी रस्ते खोदण्यासाठी परवानगी मागीतली असेल तर त्यास महासभेची मान्यता घेवूनच परवानगी देण्यात यावी असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

**विषय क्र.९** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या दि.३०.१०.२०१३ रोजी होणा-या सर्वसाधारणसभेच्या कार्यक्रम विषय पत्रिकेतील विषय क्र.३ ला अनुसरुन रहिवास वापराकरीता म्हाडाच्या अत्यल्प,मध्यम व उच्च उत्पन्न गटाच्या गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी प्रभाग क्र.१० लेबर कॉलनी नांदेड येथे उर्वरीत मोकळया भूखंडावर आरक्षण प्रस्तावित करण्यात  यावे व याकरीताचा प्रस्ताव सर्वसाधारण सभे मध्ये ठेवण्यात येवून सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात यावी.

**सुचक**:- स.जानी म.कासीम **अनुमोदक**:- इतरत फातेमा पि.स.मजहर हुसेन

**स.जानी** मी माझा प्रस्ताव परत घेत आहे

**महापौर** प्रस्तावाचे सुचकांनी आपला प्रस्ताव परत घेतला मूळे प्रस्ताव विषय पत्रिकेतून वगळण्यात  येतो.

**विषय क्र.१०** **प्रस्ताव**

नांवामनपा अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या कोटयावधी रुपयाची योजना जेएनएनयूआरएम  व बिएसयुपी योजनेचे काम करणा-या गुत्तेदारांना अंतिम बिलासोबत ९० टक्के सुरक्षा अनामत रक्कम परत करण्यात येत आहे.कार्यकारी अभियंता सा.बा.वि.मनपा नांदेड यांचेकडील सर्व कामांची सुरक्षा अनामत रक्कम दोन वर्षानंतर परत करत आहेत.कार्यकारी अभियंता त्यांच्या नांवाने कॉल डिपाझिट व FDR त्यांच्याकडे ठेवण्यात यावे त्यांच्या अधिकारावर गदा टाकण्यात येवू नये.

तसेच बांधकाम विभागातील सर्व कामांचे सुरक्षा अनामत रक्कम काम पूर्ण झाल्याचा सहा महिण्यात परत करणे करीता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक**:- स.जानी म.कासीम **अनुमोदक**:- इतरत फातेमा पि.स.मजहर हुसेन

**प्रशासकीय टिप्पणी**

सार्वजनिक बांधकाम विभाग नांवाशमनपा तर्फे विविध कामांच्या निविदा प्रसिध्द करुन सर्वात कमी दराची निविदा स्विकारुन कामे करण्यासाठी कार्यारंभ आदेश देण्यात येते .निविदा दाखल करतांना कंत्राटदारांकडून बी-१ निविदि पुस्तीका  नुसार करारनामा करण्यात येवून सुरक्षा अनामत कपात करण्यात येते. सुरक्षा अनामत रक्कम परत करण्यासाठी  बी-१ निविदा मधील खंड  क्र.१,१७, व २० नुसार काम अंतिम झालेल्या दिनांकापासून दोन वर्षानंतर सुरक्षा अनामत रक्कम परत करण्याची कार्यवाही करण्यात येते.

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक  कार्यवाही करावी.

**ठराव  क्र.१५८** **ठराव**

नांवामनपा अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या कोटयावधी रुपयाची योजना जेएनएनयूआरएम व बिएसयुपी योजनेचे काम करणा-या गुत्तेदारांना अंतिम बिलासोबत ९० टक्के सुरक्षा अनामत रक्कम परत करण्यात येत आहे.कार्यकारी अभियंता सा.बा.वि.मनपा नांदेड यांचेकडील सर्व कामांची सुरक्षा अनामत रक्कम दोन वर्षानंतर परत करत आहेत.कार्यकारी अभियंता त्यांच्या नांवाने कॉल डिपाझिट व FDR त्यांच्याकडे ठेवण्यात यावे त्यांच्या अधिकारावर गदा टाकण्यात येवू नये.तसेच बांधकाम विभागातील सर्व कामांचे सुरक्षा अनामत रक्कम काम पूर्ण
झाल्यानंतर सहा महिण्यात परत करणे करीता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.नियमानूसार आयुक्त्ांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्र.११** **प्रस्ताव**

प्रभाग क्र.७ अंतर्ग कौठा, असदवन, असर्जन, वाघाळा गावठाण, फत्तेजंगपूर व परिसर मुलभूत सुविधे पासून वंचित असल्यामूळे (रस्ते, नाली, ड्रेनेज, व पाणीपुरवठा व स्वच्छता) या पायाभूत सोई सुविधासाठी गावाचा विकास करण्यासाठी व पायाभूत सोई सुविधा उपलब्ध्द करुन देण्यासाठी विकास आराखडा तयार करुन महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव पाठवून विशेंष निधीची मागणी करण्याबाबत हि सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता प्रदान करते.

**सुचक**:- अभिषेक सौदे **अनुमोदक**:- बालाजी देविदासराव कल्याणकर

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव  क्र.१५९** **ठराव**

प्रभाग क्र.७ अंतर्ग कौठा, असदवन, असर्जन, वाघाळा गावठाण, फत्तेजंगपूर व परिसर मुलभूत सुविधे पासून वंचित असल्यामूळे (रस्ते, नाली, ड्रेनेज, व पाणीपुरवठा व स्वच्छता) या पायाभूत सोई सुविधासाठी गावाचा विकास करण्यासाठी व पायाभूत सोई सुविधा उपलब्ध्द करुन देण्यासाठी विकास आराखडा तयार करुन महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव पाठवून विशेंष निधीची मागणी

करण्यात यावी असे हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानूसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्र.१२** **प्रस्ताव**

नवा पुल ते आंबेडकर चौक रस्त्याच्या परिसरात अंधार असतो,सिडको हडकोतील वाहनधारक तसेच पादचा-याना रात्रीच्या वेळीस येण्या जाण्यासाठी त्रास होत आहे. करीता या ठिकाणी रस्त्याच्या मध्यभागी सेंट्रल स्ट्रिल लाईट सोय करण्यासाठी लागणाऱ्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत.

**सूचक :-** डॉ.ललिता मुकुंद बोकारे (शिंदे मॅडम ) **अनुमोदक** :- संजय मोरे

**डॉ.ललिता बोकारे** जूना मोंढा नवा पुल ते आंबेडकर चौक दरम्यानच्या रस्त्याचे बाजूने विद्युत दिवे नसल्यामूळे रात्री अंधार असतो ,रात्री बे रात्री नांदेडहून कौठा, वसरणी, असदवन असर्जन, सिडको हडको, व लातूर, लोहा, कंधार शहराकडे जाणा-या वाहनधारकांना तसेच पादचा-याना लूटण्याचे मारहाणीचे प्रमाण वाढलेले असून अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे.त्यामूळे या रस्त्याच्या मधोमध सेंट्रल स्ट्रिट लाईट बसविणे आवश्यक झालेले आहे.करीता गोवर्धन घाट नवा पुल ते लातूर रोड पर्यत ज्या प्रमाणे सेट्रल स्ट्रिट लाईट बसविण्यात आलेले आहे त्याच प्रमाणे जूना मोंढा नवा पुल ते आंबेडकर चौक या महत्वाच्या रस्त्याच्या मधोमध सेट्रल स्ट्रिट लाईट बसविण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात यावी.

**महापौर** सदरील रस्ता हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीचा असल्यामूळे या रस्त्याच्या मधोमध सेट्रल स्ट्रिट लाईट बसविण्यसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे शिफारस करण्यात येते.

**ठराव क्र.१६०** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील जूना मोंढा नवा पुल ते आंबेडकर चौक दरम्यानच्या रस्त्याचे बाजूने विद्युत दिवे नसल्यामूळे रात्री अंधार असतो ,रात्री बे रात्री नांदेडहून कौठा, वसरणी, असदवन असर्जन, सिडको हडको, व लातूर, लोहा, कंधार शहराकडे जाणा-या वाहनधारकांना तसेच पादचा-याना लूटण्याचे मारहाणीचे प्रमाण वाढलेले असून अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे.त्यामूळे या रस्त्याच्या मधोमध सेंट्रल स्ट्रिट लाईट बसविणे आवश्यक झालेले आहे.करीता गोवर्धन घाट नवा पुल ते लातूर रोड पर्यत ज्या प्रमाणे सेट्रल स्ट्रिट लाईट बसविण्यात आलेले आहे त्याच प्रमाणे जूना मोंढा नवा पुल ते आंबेडकर चौक या महत्वाच्या रस्त्याच्या मधोमध सेट्रल स्ट्रिट लाईट बसविण्यासाठी ही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागास शिफारस करते.

## पुरवणी विषय पत्रिका

**विषय क्र.१**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारतीतील हाऊसकिंपिंगच`(साफसफाई, गार्डनिंग व लिफट ऑपरेटर) काम ट्रिग फॅसिलिटी सर्व्हीसेस याना दि.२०.९.२०११ पासून जाहिर निवीदेने यांना एक वर्षासाठी रु.१६५००० प्रतिमहा याप्रमाणे देण्यात आले व पुन्हा त्यांचे काम समाधानकारक असल्याने त्याच दराने व नियम व अटीवर दि.२०.९.२०१२ पासून दि.१९.९.२०१३ पर्यत एक वर्ष वाढ देण्यात आली व त्यास मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र.२४ दि.२.४.२०१३ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.व सदरील इमारतीतील शौचालय साफसफाई दुरुस्तीचे काम प्रतिमहा रु.२५०००/-प्रमाणें काम देण्यात आले.सदर दोन्ही कामाची मुदत दि.१९.९.२०१३ रोजी संपली आहे. सदर दोन्ही कामासाठी जाहिरसुचना ऑनलाइन टेन्डरीग पध्दतीने प्रसिध्द करण्यात आली असता एकही निविदा प्राप्त झाली नाही व टिंग फॅसीजीटी यानी त्यांचीच दुसरी कंपनी प्रोक्लीन हॉस्पीलॅलीटी प्रा.लि.यांचे नांवे त्याच नावाने व नियम व अटीवर काम करण्याची विनंती अर्ज केला आहे.तरी प्रोक्लीन हॉस्पीटॅलीटी प्रा.लि.यांना मनपाचे मुख्य प्रशासकीय इमारतीतील हाऊस किंपींगचे (साफसफाई, गार्डनिंग व लिफ्ट ऑपरेटर) व टॉयलेट चे दोन्ही कामे दि.२०.९.२०१३ ते दि.१९.९.२०१४ या एका वर्षासाठी प्रतिमहा रु.१९००००/-पुर्वीचेच दराने दराने देण्याच्या अनुषंगाने सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभे समोर निर्णयास्तव सादर.

**महापौर** आयुक्तांव प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१६१** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारतीतील हाऊसकिंपिंगच`(साफसफाई, गार्डनिंग व लिफट ऑपरेटर) काम ट्रिग फॅसिलिटी सर्व्हीसेस याना दि.२०.९.२०११ पासून जाहिर निवीदेने यांना एक वर्षासाठी रु.१६५००० प्रतिमहा याप्रमाणे देण्यात आले व पुन्हा त्यांचे काम समाधानकारक असल्याने त्याच दराने व नियम व अटीवर दि.२०.९.२०१२ पासून दि.१९.९.२०१३ पर्यत एक वर्ष वाढ देण्यात आली व त्यास मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र.२४ दि.२.४.२०१३ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.व सदरील इमारतीतील शौचालय साफसफाई दुरुस्तीचे काम प्रतिमहा रु.२५०००/-प्रमाणें काम देण्यात आले.सदर दोन्ही कामाची मुदत दि.१९.९.२०१३ रोजी संपली आहे. सदर दोन्ही कामासाठी जाहिरसुचना ऑनलाइन टेन्डरीग पध्दतीने प्रसिध्द करण्यात आली असता एकही निविदा प्राप्त झाली नाही व टिंग फॅसीजीटी यानी त्यांचीच दुसरी कंपनी प्रोक्लीन हॉस्पीलॅलीटी प्रा.लि.यांचे नांवे त्याच नावाने व नियम व अटीवर काम करण्याची विनंती अर्ज केला आहे.करीता प्रोक्लीन हॉस्पीटॅलीटी प्रा.लि.यांना मनपाचे मुख्य प्रशासकीय इमारतीतील हाऊस किंपींगचे (साफसफाई, गार्डनिंग व लिफ्ट ऑपरेटर) व टॉयलेट चे दोन्ही कामे दि.२०.९.२०१३ ते दि.१९.९.२०१४ या एका वर्षासाठी प्रतिमहा रु.१९००००/-पुर्वीचेच दराने दराने देण्याच्या प्रस्तावास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.२** **प्रस्ताव**

पाणी पट्टी वसुली व तक्रारी स्विकारण्याकरीता सध्या गांधी पुतळा पाणी टाकी खाली व्यवस्था आहे. परंतु सदरील जागा मधल्या भागात असल्यामुळे नागरिकांना मोठया प्रमाणात त्रास होत आहे. नंदीग्राम मार्केट मधील रोड लगतचे दोन गाळे रिकामे करून त्या ठिकाणी पाणी पुरवठयाचे कर संकलन व सुविधा केंद्र स्थापन केल्यास नागरिकांची मोठया प्रमाणात सोय होईल व कर वसुली देखील वाढणार आहे.तरी नंदीग्राम मार्केट मधी गाळा क्रमांक ९ व १० भाडेकरू कडुन रिकामे करून घेऊन त्या ठिकाणी कर संकलन व सुविधा केंद्र स्थापन करण्यासाठी मान्यता देणें बाबत.

**सुचक :** पोकर्णा नवलकुमार ओमप्रकाश **अनुमोदक :** विरेंद्रसिंघ गाडीवाले

**गफारखान** कर संकलन व सुविधा केंद्र स्थापन करण्यासाठी नंदीग्राम मार्केट मधी गाळा क्रमांक ९ व १० भाडेकरू कडुन रिकामे करुन घेण्याचा प्रस्ताव देण्यात आला आहे परंतु गाळा क्र.९ व १० का निवडण्यात आले या मार्केटच्या पाठीमागे महानगरपालिकेची मोठी जागा असून त्या ठिकाणी दोन रुमचे बांधकाम करुन त्या ठिकाणी कर संकलन व सुविधा केंद्र सुरु करण्यात यावे .

**विरेंद्रसिध गाडीवाले** पाणी कर संकलन व सुविधा केंद्र स्थापन करण्यासाठी दोन गाळयाची आवश्यकता असल्यामूळे प्रशासनाच्या सोईच्या दृष्टीने गाळा क्र.९ व १० या दोन गाळयाचा प्रस्ताव देण्यात आलेला आहे.

**महापौर** गाळा क्र.९ व १० रिकामे केल्यास महानगपालिकेचे आर्थिक नुकसान होईल म्हणून या मार्केटच्या पाठीमागे महानगरपालिकेची मोठी मोकळी जागा असून या मोकळया जागेत दोन रुमचे बांधकाम करुन त्या ठिकाणी कर संकलन व सुविधा केंद्र सुरु करण्यास मान्यता देण्यात येते. सदरचा प्रस्ताव ना मंजुर करण्यात येतो.

**ठराव क्र.१६२** **ठराव**

पाणी पट्टी वसुली व तक्रारी स्विकारण्याकरीता सध्या गांधी पुतळा पाणी टाकी खाली व्यवस्था आहे. परंतु सदरील जागा अपुरी पडत असल्यामूळे नागरिकांना मोठया प्रमाणात त्रास होत आहे. गाळा क्र.९ व १० रिकामे करुन या ठिकाणी कर संकलन व सुविधा केंद्र सुरु केल्यास महानगपालिकेचे आर्थिक नुकसान होईल म्हणून नंदीग्राम मार्केटच्या पाठी मागे असलेल्या मोकळया जागेत दोन रुमचे बांधकाम करुन त्या ठिकाणी कर संकलन व सुविधा केंद्र स्थापन करण्यासाठी ही नांदेड वाधाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेंत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्र.३** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेमध्ये विद्युत विभागामध्ये दुरुस्ती व देखभाल च्या नावाखाली लाखो रुपयाचा भ्रष्टाचार होत आहे.त्याबाबत सभागृहात चर्चा घडवून आणावी व संबंधितावर कारवाई तसेच कंत्राटदाराची चौकशी करुन त्यास काळया यादीत टाकण्यात यावे.

**सुचक :** सुधाकर पांढरे **अनुमोदक :** स्नेहा सुधाकर पांढरे

**प्रशासकीय टिप्पणी**

नांदेड वाधाळा शहर महानगरपालिकेच्या हध्दीतील सार्वजनिक पथदिव्यांची दैनंदिन देखभाल,दुरुस्ती व पथदिवे दैनंदिन चालू बंद करणे या कामासाठी मे.सोनू इले.नागपूर यांचे दर मंजुर करुन त्यांच्याशी करारनामा करुन सदरील काम त्यांना एकूण (३) वर्षासाठी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे. सदरील कामावर महानगरपालिकेच्या एकूण ६ झोन अंतर्गत प्रत्येक झोन भागासाठी एक असे एकूण ६ विद्युत निरिक्षक नेमण्यात आले आहे. व ३ कनिष्ट अभियंता (विद्युत) या कामावर देखरेख व नियंत्रण करीत आहेत. विद्युत निरिक्षक हे दररोज बंद पथदिव्यांचे प्राप्त तक्रारीनुसार व त्यांनी दररोज रात्री त्यांना नेमून दिलेल्या भागात प्रत्यक्ष बंद पथदिव्याचे सर्वेक्षण करुन बंद पथदिव्याची प्रत्यक्ष साईटवर उपस्थित राहून सबंधित कंत्राटदराकडून पथदिवे दुरुस्त करुन घेवून तक्रार निवारण करुन दररोज झालेल्या कामाचे अहवाल सबंधित कनिष्ट अभियंता (विद्युत) यांच्या मार्फत उपअभियंता (विद्युत) योच्याकडे सादर करीत आहेत.मे.सोनू इले.नागपुर यांच्या मासिक देयक सर्व भागाच्या विद्युत निरिक्षक व कनिष्ट अभियंता (विद्युत) यांच्या मासिक अहवालानूसार मंजुर करण्यात येते.कत्राटदाराने दिलेल्या मुदतीत जर दुरुस्ती करुन चालू करुन दिले नसतील तर कामाच्या करारनाम्यातील अटी नुसार सबंधिताचे मासिक देयकातून दंड कपात करण्यात येते.याकामामध्ये कोणत्याही प्रकारची भ्रष्टाचार होत नसून या कामासाठीच्या करारनाम्यातील अटी व शर्तीच्या अधिन राहूनच सदरील काम होत आहे.

**स्नेहा पांढरे** विद्युत विभागामध्ये दुरुस्ती व देखभाल च्या नावाखाली लाखो रुपयाचा भ्रष्टाचार होत आहे,बाजार भावापेक्षा अधिक दराचे साहित्य बसवून देयके देण्यात येत आहे यावर सभागृहात चर्चा करुन कंत्राटदाराच्या कामाची चौकशी करण्यात यावी.

**सुधाकर पांढरे** सार्वजनिक पथदिव्यांची दैनंदिन देखभाल,दुरुस्ती व पथदिवे दैनंदिन चालू बंद करणे या कामासाठी मे.सोनू इले.नागपूर यांचे दर मंजुर करुन त्यांना कामाचे आदेश देण्यात आलेले आहे.या कामासाठी निविदा मागवितांना जवळ पास ३५ अटी व शर्ती टाकण्यात आलेल्या आहेत यामध्ये महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) ची चालू वर्षाची (अ) वर्गणी वर्ग नोंदणी प्रमाणपत्र ,सार्वजनिक पथदिव्याचे दैनंदिन देखभाल दुरुस्तीचे कमीत कमी वार्षिक रु.३५ लाखापर्यत काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र ,अशा खुप जाचक अटी टाकल्यामूळे कंत्राटदराना निविदा भरता आलेल्या नाहीत. यामध्ये स्पर्धा झालेली नाही. बाजार भावा पेक्षा जास्त किमतीचे साहित्य बसवून त्याचे बिलाची अदाई करण्यात येत आहे.३० -३५ रुपयाला टयुब येतो तो ३५० रुपयाला खरेदी करण्यात येत आहे.प्रत्येक साहित्यात वाढ आहे.याबाबीकडे आयुक्त्तांनी लक्ष घालून यापुर्वी या कामासाठी देण्यात

आलेले निविदा दर काय होते. मे.सोनू इले.नागपुर यांचे काय दर आहे याची तुलना करुन व विद्युत साहित्याची बाजार भावाची तपासणी करुन आयुक्तांनी योग्य तो निर्णय घ्यावा अशी विनंती आहे.

**सरजितसिंघ गिल** मागील कंत्राटदराचे दर काय होते मे.सोनू इले.नागपुर यांचे काय दर आहेत बाजार भावातील दर काय आहे याची चौकशी करुन आयुक्तांनी योग्य तो निर्णय घ्यावा.

**महापौर** श्री सुधारक पांढरे यांनी उपस्थित केलेल्या मुद्या बाबत आयुक्तांनी चौकशी करुन योग्य तो निर्णय घ्यावा.

**ठराव क्र.१६३** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेमध्ये विद्युत विभागामध्ये दुरुस्ती व देखभाल च्या नावाखाली लाखो रुपयाचा भ्रष्टाचार होत असल्याची तक्रार स.सदस्यांनी केलेली आहे. तरी याबाबत आयुक्तांनी सविस्तर चौकशी करुन योग्य तो निर्णय घ्यावा असे ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते.

**विषय क्र.४** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे दोन वेळा नगरसेवक पद व नोव्हेंबर २००२ ते सप्टेंबर २००३ या कालावधीत स्थायी समितीचे पद भूषविलेले खुर्शीद अन्वर जहागिरदार यांचे अकाली निधन झाले. त्याची नोद महानगरपालिकेच्या स्थायीसमितीने व सर्वसाधारणसभेने यापुर्वीच घेतलेली आहे. परंतु त्यांच्या समाज कार्याची लोकसेवेची जाणीव आठवण नांदेड
शहरवासीयांनी ठेवावी म्हणून प्रभाग क्र.३२ मधील पाठक गल्ली येथील खमरोध्दीन मस्जीद येथील अब्दुल बारी लिबर्टी टॉकीज वाले यांचे धरासमोरील असलेल्या चौकाला खुर्शीद अन्वर जहागिरदार असे नांव देण्याचा ठराव ही सस्भा सर्वानुमते संमत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- गुरुखुदे सुंदरलाल किशनलाल (तुलजेस यादव), सय्यद जानी मो.कासीम

**अनुमोदक** :- शेख हबीब बावजीर,सुदर्शना महेश खोमणे, वाजेदा तबसुम अथर अली , अंजूम बेगम शेख अफरोज
विनय पाटील, फारुख हुसेन कासिमसाब

**महापौर** स.सदस्याचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेंत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१६४** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे दोन वेळा नगरसेवक पद व नोव्हेंबर २००२ ते सप्टेंबर २००३ या कालावधीत स्थायी समितीचे पद भूषविलेले खुर्शीद अन्वर जहागिरदार यांचे अकाली निधन झाले. त्याची नोद महानगरपालिकेच्या स्थायी समितीने व सर्वसाधारणसभेने यापुर्वीच घेतलेली आहे. परंतु त्यांच्या समाज कार्याची लोकसेवेची जाणीव आठवण नांदेड शहर वासीयांनी ठेवावी म्हणून प्रभाग क्र.३२ मधील पाठक गल्ली येथील खमरोध्दीन मस्जीद येथील अब्दुल बारी लिबर्टी टॉकीज वाले यांचे धरासमोरील असलेल्या चौकाला खुर्शीद अन्वर जहागिरदार असे नांव देण्यसा ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.५** **प्रस्ताव**

सिडकोस्थित एन.डी.४१ बुध्द विहाराजवळ गोर गरीब दलितांची वस्ती आहे.येथील अभ्यासु विद्यार्थ्याची जागेविना गैरसोय होत आहे.सिडको वसाहतीतील ही धरे एका खोलीची (रुमची ) असल्यामूळे विद्यार्थ्याना अभ्यास केंद्राची गरज आहे.

करीता या भागात महानगरपालिका निधीतुन एक अभ्यासकेंद्र बांधण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत.

**सुचक** :- डॉ.ललिता मुकुंद बोकार (शिंदे मॅडम) प्रभाग क्र.३९ **अनुमोदक**:- विनय गिरडे पाटील,प्रभाग क्र.३९

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. नियमानूसार आयुक्तीनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र.१६५** **ठराव**

सिडकोस्थित एन.डी.४१ बुध्द विहाराजवळ गोर गरीब दलितांची वस्ती आहे.येथील अभ्यासु विद्यार्थ्याची जागेविना गैरसोय होत आहे.सिडको वसाहतीतील ही धरे एका खोलीची (रुमची ) असल्यामूळे विद्यार्थ्याना अभ्यास केंद्राची गरज आहे.

करीता या भागात महानगरपालिका निधीतुन एक अभ्यासकेंद्र बांधण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता ही नांवामनपा सर्वसाधारणसभ सर्वानुमते देते .नियमानूसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्र.६** **प्रस्ताव**

मिर्झा फारुख बेग पि.पिर बेग राहणार रजा नगर नांदेड येथील रहिवासी असून त्यांनी मोल मंजुरी करुन आपल्या मुलांना शिक्षण दिले आहे.त्याचे दोन मुल सुशिक्षीत असून बेरोजगार आहेत तरी त्यांना स्वत:चे कारोभार व्यापार करण्यासाठी जागा हवी आहे.तरी महमंद अली रोडवरील २० x २० ची मोकळी जागा भाडे तत्वावर देवून स्वत:बांधून घेण्यास ही सभा सर्वानुमते मंजुरी देणे

**सुचक :-** फारुख अली कासीम साब **अनुमोदक**:- हसन बिन उबेद अल केसरी

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. नियमानूसार आयुक्तीनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्र.१६६** **ठराव**

मिर्झा फारुख बेग पि.पिर बेग राहणार रजा नगर नांदेड येथील रहिवासी असून त्यांनी मोल मंजुरी करुन आपल्या मुलांना शिक्षण दिले आहे.त्याचे दोन मुल सुशिक्षीत असून बेरोजगार आहेत तरी त्यांना स्वत:चे कारोभार व्यापार करण्यासाठी जागा हवी आहे.तरी महमंद

अली रोडवरील २० x २० ची मोकळी जागा भाडे तत्वावर देवून स्वत:बांधून घेण्यास ही सभा सर्वानुमते मंजुरी देते.नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.७** **प्रस्ताव**

प्रभाग क्र.३७ कौठा या प्रभागातील भोगोलीक व्याप्ती विस्तृत असल्यामूळे या प्रभागात कौठा असदवन,असर्जन, वाघाळा,गाव फत्तेजंगमपुर,नविन कौठा,वसरणी आदी मोठया प्रमाणात विस्तृत विभाग येत असल्यामूळे व त्या भागातील लोकसंख्या लक्षात घेता दैनंदिन साफसफाईला अडचण होवून नागरीकांचे आरोग्य धोक्यात येत आहे त्यामूळे स्वतंत्र स्वच्छता निरीक्षक या प्रभागासाठी नियुक्ती करण्याच्या संदर्भात हि सर्वसाधारण सभा संमती देवून हा ठराव याच सभेत मान्य करण्यात येत आहे.

**सुचक** :- अभिषेक सौदे **अनुमोदक**:- सौ.संगिता पृथवीराज राओत्रे,सौ.सुदर्शना महेश खोमणे

**महापौर** स.सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. नियमानूसार आयुक्तीनी पुढील वैधानिक . कार्यवाही करावी.

**ठराव क्र.१६७** **ठराव**

प्रभाग क्र.३७ कौठा या प्रभागातील भोगोलीक व्याप्ती विस्तृत असल्यामूळे या प्रभागात कौठा असदवन, असर्जन, वाघाळा, फत्तेजंगमपुर,नविन कौठा,वसरणी आदी मोठया प्रमाणात विस्तृत विभाग येत असल्यामूळे व त्या भागातील लोकसंख्या लक्षात घेता दैनंदिन साफसफाईला अडचण होवून नागरीकांचे आरोग्य धोक्यात येत आहे त्यामूळे या भागातील साफसफाईच्या कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र स्वच्छता निरीक्षकाची नियुक्ती करण्यास हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेंत कायम करण्यात येतो.नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्र.८** **प्रस्ताव**

नांवामनपा हध्दीमध्ये महानगरपालिकेच्या मालकीच्या मोकळया जागा किती आहेत व त्यापैकी कुठल्या मोकळया जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आहेत आणि किती व कोणत्या जागे बाबत मा.न्यायालयामध्ये प्रकरणे प्रलंबित आहेत याबाबत सविस्तर माहिती सभागृहात देणे बाबत.

**सुचक** :- रावत दिपकसिंह काशिनाथसिंह **अनुमोदक**:- कल्याणकर बालाजी दत्तराव

**दिपकसिंह रावत** २१ जूलैं १९५० ला तत्कालिन नांदेड नगरपालिकेने आपल्या मालकीची जागा नांदेड एज्युकेशन सोसायटीला शैक्षणिक कार्यासाठी ३५ जमिन एकर जमिन दानपत्र करुन दान दिली होती. नगरपालिकेने सदरील जागा ही फक्त शैक्षणिक कार्यासाठी दिलेली असतांना नांदेड एज्युकेशन सोसायटीने ३५ एकर जागेपैकी काही जागा विद्यानगर हौ.सोसायटीला विकली ही बाब नांदेड वाधाळा शहर महानगरपालिकेच्या निदर्शनास आल्यानंतर नांदेड एज्युकेशन सोसायटीने दान दिलेल्या जागेकरीता ज्या काही अटी व शर्ती टाकल्या होत्या त्याचे उल्लंघन केल्याबध्दल मुबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ८१(ब) नुसार जागा रिकामी करुन देण्याबाबत नोटीस दिली. या नोटीसीच्या विरोधात नांदेड एज्युकेशन सोसायटीने न्यायालयात याचिका दाखल केली न्यायालयाने दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेवून नांदेड वाडाळा शहर महानगरपालिकेच्या बाजूने निर्णय दिलेला असतांनाही नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने आज पर्यत सदरील जागा ताब्यात घेतलेली नाही.या निर्णयाच्या विरुध्द नांदेड एज्युकेशन सोसायटीने उच्य न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे. २५ एकर जागे पैकी १५एकर जागा शिल्लक आहे आम्हाला असे समजले आहे की. प्रशासन व नांदेड एज्युकेशन सोसायटीचे पदाधिकारी ,भूखंड माफिया यांचेत अर्शी तडजोड चालू आहे, १५ एकर जागे पैकी ३ एकर जागा महनगरपालिकेने घ्यावी व १२ एकर जागा सोसायटीला द्यावी, असे आम्ही ऐकले आहे. त्यामूळे न्यायालयात प्रकरण चालू असतांना सर्वसाधारण सभेची मान्यता न धेता प्रशासनाने परस्पर कोणत्याही प्रकारची तडजोड करण्यात येवू नये.न्यायालयात जो काही निकाल लागेल तो अंतिम राहिल.

२) असदुल्लाबाद येथील शास्त्रीनगर भागातील सर्व्हे नं.५० चा अभिन्यास मंजुर करण्यात आलेला असून या मंजुर अभिन्यासातील जी ओपन स्पेस दाखविण्यात आली होती त्या ओपन स्पेस मध्ये संचिका क्र.५०३/१७/२०११-१२ अन्वये गुंठेवारी पध्दतीने बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.नियमानुसार मंजुर ले आवूट मधील ओपन स्पेस मध्ये गुठेवारी पध्दतीनूसार बांधकाम परवानगी देता येत नाही त्यामूळे बेकायदेशिर देण्यात आलेली बांधकाम परवानगी रध्द करुन ओपन स्पेस महानगरपालिकेने ताब्यात घ्यावी.

२) संचिका क्र.३८७/१७/२०२१-२०१२ मध्ये बांधकामाची परवानगी देण्यात आली ती अभिन्यासाती खुल्या जागेवर देण्यात आलेली आहे. सदरील देण्यात आलेली बांधकामाची परवानगी बेकायदेशिर असल्यामूळे ती रध्द करुन जागा ताब्यात घेण्यात यावी.

३) संचिका क्र.एसओसी/१५६२/१७/२७.२.२०१३ अनवये मंजुर ले आवूट मधील मोकळया जागेत बिल्डर्सला सदनिकेचे (अर्पाटमेंट) बांधकाम करण्यासाठी परवानगी देण्यात आलेली आहे.

उदाहरण दाखल मी हे प्रकरण दिलेले आहे शहरातील मंजुर ले आवूट मधील मोकळया जागेत अनेक ठिकाणी बेकायदेशिर बांधकामाच्या परवानग्या देण्यात आलेल्या आहेत काही जागेत बेकायदेशिररित्या अनाधिकृत बांधकामेही झालेली आहे.गुठेवारी पध्दतीचा आधार घेवून नेही अनेक ठिकाणी आरक्षित जागेवर असलेली अनाधिकृत बांधकामे नियमित करण्यात आलेली आहे किंवा त्या आरक्षित जागेवर बांधकामाच्या परवानग्याही देण्यात आलेल्या आहेत त्यामूळे ले आवूटमधील मोकळया जागा महानगरपालिकेने ताब्यात घ्याव्यात.ज्या

ओपनस्पेस मध्ये ज्यां बांधकामाच्या परवानग्या देण्यात आल्या त्या रध्द करुन ज्या अधिका-यानी अशा बेकायदेशिर बांधकामाच्या परवानग्या दिल्या त्याचे विरुध्द कार्यवाही करण्यात यावी.

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** श्री दिपकसिंह रावत यांनी ओपन स्पेसचा खुप चांगला प्रस्ताव मांडला आहे.शहरातील जागा मालकानी हौसिंग सोसायटीजने जागोचे ले आवूट मंजुर करुन घेतल्यानंतर त्यातील ले आवूट मधील ओपन स्पेस जागा विकलेल्या आहेत व ओपन स्पेस च्या रजिस्ट्रया रध्द करण्यासाठी व त्ंयाचे नांवे पिआर कार्डही काढलेले आहेत ते शोधून रध्द करण्यासाठी भूमि अभिलेख कार्यालयास कळविण्यात यावे. व लक्ष्मीनगर भागातील जमिन मालकानी १९९० ला सुधारीत ले आवूट मंजूर करुन घेतला व त्यांतन खोटी माहिती देवून १९९० ला सुधारीत ले आवूट मंजुर करुन नागार्जून हॉटेल ते रिजनल वर्कशॉप पूर्णा रोडच्या दक्षिण बाजूची जागा अभिन्यासास खुली दाखविलेली जागा आहे. या जागे बाबत जमिन मालकानी १९८४ न्यायालयात वाद दाखल केला होता त्यांना जागेचा वाद माहित असतांना वादग्रस्त जागा ओपन स्पेस दाखवून खोटी माहिती आधारे १९९० ला सुधारीत ले आवूट मंजुर करुन घेतला , करीता १९९० चा सुधारीत ले आवूट रध्द करुन सदरील ले आवूट मधील ओपन स्पेसच्या जागेच्या ज्या रजिस्ट्रया पिआर कार्ड काढले ते रध्द करुन त्या जागेवर देण्यात आलेल्या बांधकाम परवानग्या रध्द करण्यात याव्यात किंवा त्या स्थगीत करण्यात याव्यात.

**दिपकसिंह रावत** मंजुर करण्यात आलेल्या ले आवूट मंधील जागा या सार्वजनिक वापराकरीता सोडण्यात आलेल्या असून एमआरटिपी ॲक्ट प्रमाणे ओपन स्पेस मधील जागा विकता येत नाही व त्यावर बांधकामाची परवानगीही देता येत नाही.

**रामनारायणजी काबरा** तत्कालिन नादेड नगरपालिकेने १९५० ला शैक्षणिक कार्यासाठी नंादेड एज्युकेशनला जागा दान दिली होती .जर संस्था त्या जागेची विक्री करुन त्या जागेवर शॉपिंग कॉम्प्लेक्स चे बांधकाम होत असेल तर दानपत्रातील अटी व शर्ती उल्लंघन होत आहे काय हे पाहून नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी. तत्कालिन नांदेड नगरपालिकेने अनेक संस्थांना सामाजिक कार्यासाठी शैक्षणिक कार्यासाठी जागा दिलेल्या आहेत ज्या उध्देशासाठी जागा दिलेल्या आहेत त्याच उध्देशाने जागेचा वापर व्हावयास पाहिजे.

**सरजितसिंध गिल** श्री दिपकसिंह रावत यांनी ओपन स्पेस जागेचा जो ठराव ठेवलेला आहे तो महानगरपालिकेच्या हिताचाच ठराव आहे.ज्या अधिका-यांनी ले आवूट मधील ओपन स्पेस वर बॉण्ड पेपरवर बांधकामाच्या परवानग्या दिल्या त्या अधिका-या विरुध्द कार्यवाही होणे आवश्यक आहे. माझ्याही प्रभागातील ओपन स्पेसच्या जागेत बांधकाम परवानगी देण्यासाठी अर्ज आला होता परंतु नगररचनाकार श्री कदम यांनी त्या ठिकाणी बांधकामाची परवानगी नाकारलेली आहे. स्थायी समितीने महानगरपालिकेच्या मोकळया जागेस तारेचे कुंपन /संरक्षित भिंतीचे बांधकाम करण्यासाठी चालू वर्षाच्या अदाजपत्रकात १.०० कोटीची तरतूद करण्याची शिफारस केली होती त्यास महासभेने मान्यता दिलेली आहे. परतु दूर्देवाने त्याची अमलबजावणी होत नाही. सभागृहास माझी विनंती आहे की. तत्कालिन नांदेड नगरपालिकेने व आता महानगरपालिकेने जेवढे ले आवूट मंजुर करण्यात आलेले आहेत त्या मंजुर करण्यात आलेल्या ले आवूट मंधील किती जागा नगरपालिकेने महानगरपालिकेने आपल्या ताब्यात घेतल्या किती जागा अद्याप ताब्यात घ्यावयाच्या आहेत किती ओपन स्पेसच्या जागेवर अनाधिकृतरित्या बांधकाम करण्यात आले किती ओपन स्पेसच्या जागेवर बेकायदेशिरपण बांधकामाची परवानगी देण्यात आली ,ओपन स्पेसच्या जागेवर किती नागरीकानी पिआर कार्ड काढले ,गुंठेवारी नियमाचा आधार धेवून किती आरक्षित जागेवर ,ओपनस्पेसच्या जागेवर बेकायदेशिररित्या बाधकामाच्या परवानग्या दिल्या याची सविस्तर चौकशी करुन पुढील कायदेशिर कारवाई करण्यासाठी महापौरांच्या अध्यक्षतेखाली श्री आनंद चव्हाण,उपमहापौर, श्री विरेंद्रसिंध गाडीवाले, सभागृहनेते, श्री दिपकसिंह रावत, विरोधी पक्षनेते, श्री स.शेर अली ,गटनेते,एमआयएम. याची एक उपसमिती कायम करण्यात यावी असा माझा प्रस्ताव आहे.

**दिपकसिंह रावत** श्री सरजितसिंध गिल यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे. तसेच या उपसमिती मध्ये श्री सरजितसिंध गिल श्री विनंय पाटील यांचाही समावेश करण्यात यावा.

**महापौर** नंादेड एज्युकेशन सोसायटीला दान म्हणून देण्यात आलेल्या जागेच्या संदर्भात मा.उच्य न्यायालय खंडपीट औरंगाबाद येथे याचिका क्र.डब्ल्यूपि न.५२९०/२००६ व क्र.डब्ल्यूपि न.५३७३/२००६ प्रविष्ट असल्यामूळे त्यावर कोणत्याही प्रकारचा निर्णय आपणास घेता येणार नाही. .तसेच श्री सरजितसिंघ गिल यांनी मांडलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.१६८** **ठराव**

तत्कालिन नांदेड नगरपालिकेने व त्यानंतर नांदेड वाधाळा शहर महानगरपालिकेने महानगरपालिका हध्दीतील जागेचे जेवढे ले आवूट मंजुर केलेले आहेत त्या मंजुर ले आवूट मंधील किती जागा नगरपालिकेने /महानगरपालिकेने आज पर्यत आपल्या ताब्यात घेतल्या किती जागा अद्याप ताब्यात घ्यावयाच्या आहेत किती ओपन स्पेसच्या जागेवर अनाधिकृतरित्या बांधकाम करण्यात आले किती ओपन स्पेसच्या जागेवर बेकायदेशिरपण बांधकामाची परवानगी देण्यात आली ,नागरीकांनी अशा ओपन स्पेस मधील किती जागा खरेदी करुन पिआर कार्ड काढले, गुंठेवारी नियमाचा आधार धेवून किती आरक्षित जागेवर/ओपनस्पेसच्या जागेवर बेकायदेशिररित्या बाधकामाच्या परवानग्या दिल्या याची सविस्तर चौकशी करुन पुढील कायदेशिर कारवाई करण्यासाठी महापौरांच्या

अध्यक्षतेखाली श्री आनंद चव्हाण,उपमहापौर, श्री विरेंद्रसिंध गाडीवाले, सभागृहनेते, श्री दिपकसिंह रावत, विरोधी पक्षनेते, श्री स.शेर अली ,गटनेते,एमआयएम. श्री विनय पाटील श्री सरजितसिंध गिल सौ.सुदर्शना महेश खोमणे यांची एक उपसमिती कायम करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते,या उपसमितीने उपरोक्त सर्व बाबीची चौकशी करुन पुढील वैधानिक कार्यवाही करावी असेही ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते संमत करते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.९** **प्रस्ताव**

महानगरपालिकेच्या घन कच-या पासून खत निर्मिती प्रकल्प कामाच्या प्रगती बाबत चर्चा करणे .

**सुचक** :- स.विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक**:- स.सरजितसिंघ गिल

**विरेंद्रसिंघ गाडीवाले.** शहरातील कचरा शहराबाहेर म्हणजे प्रकल्पाच्या ठिकाणी टाकण्याची सुरवात करण्यात आलेली आहे परंतु अद्याप खत निर्मितीचा प्रकल्प सुरु करण्यात आलेला नाही. खत निर्मीतीचा प्रकल्प लवकरात लवकर सुरु करण्यासाठी आयुक्तांनी महापौरानी कार्यवाही करावी. याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार महापौर व आयुक्तांना देण्यात यावे.

**सरजितसिंध गिल** श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे. संबंधित एजन्सीजला वारंवार मुदतवाढ देवूनही त्यांनी प्रकल्प सुरु केला नसल्यामूळे एजन्सीज विरुध्द कार्यवाही करण्यात यावी.

**अनुजा तेहरा** अेटूझेडला लवकरात लवकर टर्मीनेशनची नोटीस देवून फ्रेश निविदा मागविण्यात याव्यात. अेटूझेंड कंपनीला आठ वेळेस मुदतवाढ देवूनही त्यांनी प्रकल्प पुर्ण केलेला नाही. आमचे नेते तथा माजी मुख्यमंत्री आ.श्री अशोकरावजी चव्हाण यांनी नांदेड शहर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजने अंतर्गत कोटयावधी रुपयाचा निधी दिलेला आहे. आयुक्त साहेबांना विनंती आहे की, तात्काळ संबंधीत एजन्सीजला टर्मीनेशनची नोटीस देवून नव्याने घन कच-यापासून खत प्रकल्पासाठी प्रकल्पासाठी निविदा मागवाव्यात.

**संगिता राओत्रे** माझ्या प्रभागात कच-याचे ढिग जमा झालेले असून ते उचलण्यात येत नसल्यामूळे नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे.करीता नियमित कचरा उचलण्यासाठी घंटागाडीची संख्या वाढविण्यासाठी तसेच साफसफाई करण्यासाठी मजुराची संख्या वाढविण्यासाठी अेटूझेडला आदेश द्यावेत. अेटूझेड साफसफाईचे काम योग्यरित्या करीत नसल्यामूळे त्याचे विरुध्द कार्यवाही करण्यात यावी.

**ललिला बोकारे शिंदे** अेटूझेड कंडून नियमित साफसफाई होत नसल्यामूळे त्याचे कामाची चौकशी करण्याकरीता एक उपसमिती कायम करण्यात यावी

**फारुख अली खॉ** अेटूझेडच्या कामाबाबत किती दिवस वर्ष स्थायी समिती,सर्वसाधारण सभेत चर्चा होणार आहे. प्रत्येक नगरसेवक अेटूझेडकडून प्रभागात साफसफाई होत नाही, कच-याचे ढिग जमा झाले नियमित कचरा उचलल्या जात नाही. अश्या तक्रार करीत आहेत.नगरसेवकांनी साफसफाईच्या कामाबाबत विचारणा केली असता अेटूझेड आमचे कामाचे पेमेट झाले दिले नाही मजुरांना पेमेट करण्यात आले नसल्यामूळे मजुर संपावर गेले, डिझेलला पैसे दिले नसल्यामूळे वाहने बंद आहे असेच सांगतात त्यामूळे अेटूझेड विषयी सभागृहाने ठोस निर्णय घ्यावा.

**अशोक उमरेकर** अेटूझेडच्या मानसाला १५ वेळेस फोन करुनही ते तक्रारीची पुर्तता करीत नाही,वारंवार कचरा उचलण्याची वाहने ना दुरुस्त असल्याचे सांगतात,एका प्रभागातील कचरा उचलण्याठी फक्त २-२ वाहने व २-२ मजुर देण्यात आलेली आहे या साधनसामुग्रीवर पूर्ण प्रभागातील कचरा उचलल्या जात नाही. अैटूझेडला जी मुदतवाढ देण्यात आलेली आहे ती कोणत्या नियमानूसार कारणानूसार देण्यात आली ते समजत नाही. यामध्ये काही आर्थिक व्यवहार झालेला आहे काय स्थायी समितीचे सदस्य वारंवार फोन करुनही ते फोन उचलीत नसल्यामूळै अेटूझेड कंपनीचे काम रध्द करुन त्यांना ब्लॅक लिस्ट मध्ये टाकण्यात यावे.

**सरजितसिंघ गिल** घर कच-यापासून खत निर्मिती प्रकल्पाचा निविदा रध्द झाला आहे. नव्याने निविदा मागवून त्यास मान्यता देण्यासाठी स्थायी समितीकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा.अेटूझेडच्या

**बाळासाहेब देशमूख** प्रत्येक प्रभागातील साफसफाई करीता फक्त ३-३ मजुर देण्यात आलेले आहे त्यांचेकडून पुर्ण प्रभागाची साफसफाई होत नाही त्यामूळे मजुरांची संख्या वाढविण्यासाठी कंत्राटदारास आदेशित करण्यात यावे.

**नवलकुमार पोकर्णा** पोलिस संरक्षणात तुप्पा येथे शहरातील घाण कचरा टाकण्यात येत आहे. या घाण कच-यामूळे तुप्पा भागातील नागरीकांना मोठया प्रमाणात त्रास होत आहे करीता तुप्पा भागात टाकण्यात आलेला कचरा उचलण्यात यावा.

**अभिषेक सौदे** शहरातील साफसफाईच्या कामाचे खाजगी करण करण्यात आलेले असून महानगरपालिका अस्थापनेवरील जे सफाई पुरुष व स्त्रि मजुर आहेत ते कुठे काम करतात अधिका-यांच्या कर्मचा-यांच्या घरी काम करतात का कार्यालयात काम करतात यांचा खुलासा करण्यात यावा. प्रभागात मजुर कमी असल्यामूळे प्रभागातील साफसफाई योग्य होत नाही.महानगरपालिका अस्थापनेवरील मजुर इतर ठिकाणी काम करीत असतील त्यांना प्रभागातील साफसफाईचे कामासाठी पाठविण्यात यावे.व प्रत्येक प्रभागाकरीता ३-३ मजुर वाढविण्यात यावे .

**महापौर** नांदेड वाघळा शहर महानगरपालिका हदीतील निघणा-या घन कच-यापासून खत निर्मिती प्रकल्प उभारण्याचे काम अेटूझेड कंपनीस तीन चार वर्षापुर्वी देण्यात आलेले असून अद्यापही खत निर्मितीचा प्रकल्प कार्यान्वीत झालेला नाही करीता कायदेशिर बाबींची पुर्तता करुन खत निर्मिती प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वीत करण्यासाठी आयुक्तानी पुढील वैधानिक कार्यवाही करावी तसेच शहरातील साफसफाईचे काम करण्यासाठी अेटूझेड कंपनीबरोबर जो करारनामा करण्यात आलेला आहेत त्या करार

नाम्यातील अटी नुसार प्रत्येक प्रभागा अंतर्गत/ क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत साफसफाईच्या कामासाठी दररोज आवश्यक तेवढे मजुर देण्यात येतात किंवा नाही,कचरा उचलण्यासासाठीही आवश्यक तेवढे वाहन लावण्यात आलेले आहे किंवा नाही,मजुराचे कामावर नियत्रण ठेवण्यासाठी पुरेसे सुपरवायझर आहे किंवा नाही. त्यांनी उचललेल्या कच-याचे वजन नियमानुसार करण्यात येते किंवा नाही याची सविस्तर चौकशी करुन अेटूझेड कंपनीशी केलेल्या करारनाम्यानुसार शहरातील साफसफाईचे काम होण्यासाठी उपाय योजना करण्याकरीता महापौरांच्या अध्यक्षतेखाली श्री विरेंद्रसिंघ गाडीवाले, सभागृहनेते, श्री दिपकसिंह रावत, विरोधी पक्षनेते, श्री स.शेर अली ,गटनेते,एमआयएम, श्री उमेश पवळे,सौ.सुदर्शना महेश खोमणे,उपआयुक्त स्वच्छता विभाग, श्री विजय मुंडे, क्षेत्रिय अधिकारी ,क्षेत्रिय कार्यालय क्र.१ ते ६ ंयांची एक उपसमिती कायम करण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येते.

**ठराव क्र.१६९** **ठराव**

नांदेड वाघळा शहर महानगरपालिका हदीतील निघणा-या घन कच-यापासून खत निर्मिती प्रकल्प उभारण्याचे काम अेटूझेड कंपनीस तीन चार वर्षापुर्वी देण्यात आलेले असून अद्यापही खत निर्मितीचा प्रकल्प कार्यान्वीत झालेला नाही करीता कायदेशिर बाबींची पुर्तता करुन खत निर्मिती प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वीत करण्यासाठी आयुक्तानी पुढील वैधानिक कार्यवाही करावी असे ही नांवामनपा सर्वसाधारणसभा सर्वानुमते संमत करते.

तसेच नांदेड वाघाळा शहर महाननगरपालिका हध्दीतील साफसफाईचे कंत्राट अेटूझेड कंपनीस देण्यात आलेले असून अे टू झेड कंपनीकडून शहरातील नियमित व योग्य प्रकारे साफसफाई होत नाही ,जागोजागी कच-याचे ढिग आढळून येतात नियमित कचरा उचलल्या जात नाही. प्रभागात साफसफाईच्या कामासाठी मजुराची संख्या अपुरी आहे. कचरा उचलण्यासाठी वाहने अपुरे आहेत अशा प्रकारच्या तक्रारी वारंवार स.सदस्याकडून नागरीका होत आहेत. करीता शहरातील साफसफाईचे काम करण्यासाठी अेटूझेड कंपनीबरोबर जो करारनामा करण्यात आलेला आहेत त्या करार नाम्यातील अटी नुसार प्रत्येक प्रभागा अंतर्गत/ क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत साफसफाईच्या कामासाठी दररोज आवश्यक तेवढे मजुर देण्यात येतात किंवा नाही,कचरा उचलण्यासासाठीही आवश्यक तेवढे वाहन लावण्यात आलेले आहे किंवा नाही,मजुराचे कामावर नियत्रण ठेवण्यासाठी पुरेसे सुपरवायझर आहे किंवा नाही. त्यांनी उचललेल्या कच-याचे वजन नियमानुसार करण्यात येते किंवा नाही याची सविस्तर चौकशी करुन अेटूझेड कंपनीशी केलेल्या करारनाम्यानुसार शहरातील साफसफाईचे काम होण्यासाठी उपाय योजना करण्याकरीता महापौरांच्या अध्यक्षतेखाली श्री विरेंद्रसिंध गाडीवाले, सभागृहनेते, श्री दिपकसिंह रावत, विरोधी पक्षनेते, श्री स.शेर अली ,गटनेते,एमआयएम, श्री श्री उमेश पवळे,सौ.सुदर्शना महेश खोमणे,उपआयुक्त स्वच्छता विभाग,श्री विजय मुंडे, क्षेत्रिय अधिकारी,क्षेत्रिय कार्यालय क्र.१ ते ६ ंयांची ंयांची एक उपसमिती कायम करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते, व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.१०**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० (३) अन्वये स्थायी समितीच्या रिक्त झालेल्या आठ (०८) सदस्यांच्या जागेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम कलम २० (५) व ३१-(अ) अन्वये पालिका सदस्यातुन स्थायी समितीवर ८ सदस्यांची नियुक्ती करणे.

**आयुक्त** संख्या बळानूसार नामनिर्देशनाव्दारे स्थायी समितीवर ८ सदस्याची नियुक्ती करण्यासाठी सभागृह नेते श्री विरेंद्रसिंध गाडीवाले, व अेआयएमआयएम व संविधान पार्टीचे गटनेते.श्री स.शेर अली महेबुब अली. यांनी माझ्याकडे व मा.महापौरांकडे दिलेले बंद लिफाफे सर्वासमक्ष उघडण्यात येत असून त्यातील नांवे सभागृहात वाचून दाखविण्यात येत आहे.

**भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस व अपक्ष आघाडीचे स.सदस्य**

१) विनय विश्वंभर पाटील
२) पवळे उमेश देवराव
३) वाजेदा तब्बसुम अथर उल ईमान
४) गाडगे शंकर जयवंतराव
५) किशोर किशनलाल यादव
६) चाऊस हसीना बेगम साबेर

**अेआयएमआयएम व संविधान आघाडी**

१) अ.हबीब अ.रहिम बागवान
२) बावजीर शेख हबीब शेख अब्दुल्ला

**महापौर** सभागृह नेते श्री विरेंद्रसिंध गाडीवाले, सभागृह नेते, अेआयएमआयएम व संविधान पार्टीचे गटनेते श्री स.शेर अली महेबुब अली. संख्याबळानूसार ८ सदस्यांची नांवे बंद पाकीटात दिली होती. आयुक्तानी

सदरील बंद पाकीट उघडून त्यातील नांवे वाचुन दाखविलेली आहे. आलेल्या नांवावर कोणाचा काही आक्षेप आहे काय,

**महापौर** आलेल्या नांवावर कोणाचाही आक्षेप नसल्यामूळे स्थायी समितीवर

१) विनय विश्वाबंर पाटील
२) पवळे उमेश देवराव
३) वाजेदा तब्बसुम अथर उल ईमान
४) गाडगे शंकर जयवंतराव
५) किशोर किशनलाल यादव
६) चाऊस हसीना बेगम साबेर
७) अ.हबीब अ.रहिम बागवान
८) बावजीर शेख हबीब शेख अब्दुल्ला

या आठ सदस्यांची संख्याबाळानूसार नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती झाल्याचे जाहिर करण्यात येते.

**ठराव क्र.१७०** **ठ रा व**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० व सुधारीत कलम ३१ (अ) मधील तरतूदी नुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील मान्यता प्राप्त पक्षाचे/नोंदणीकृत पक्षाचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून सभागृह नेता, ऐआयएमआयएम व संविधान आघाडीचें गटनेते यांनी शासन परिपत्रक क्रं. संकिर्ण २०१०/प्रक्र.-८५/नवि-३२ दि. ६ जुलै २०१० मध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे सदस्यांची नेमणूक करण्यासाठी बंद पाकीटात दिलेल्या नांवा प्रमाणे स्थायी समितीवर खालील प्रमाणे (८) पालिका सदस्याची नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यास ही नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सर्वश्री**

१) विनय विश्वाबंर पाटील, भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस व अपक्ष आघाडी
२) पवळे उमेश देवराव, भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस व अपक्ष आघाडी
३) वाजेदा तब्बसुम अथर उल ईमान ,भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस व अपक्ष आघाडी
४) गाडगे शंकर जयवंतराव,भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस व अपक्ष आघाडी
५) चाऊस हसीना बेगम साबेर, भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस व अपक्ष आघाडी
६) किशोर किशनलाल यादव, भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस व अपक्ष आघाडी
७) अ.हबीब अ.रहिम बागवान ऐआयएमआयएम व संविधान आघाडी
८) बावजीर शेख हबीब शेख अब्दुल्ला, ऐआयएमआयएम व संविधान आघाडी

**महापौर** दि.२५.११.२०१३ च्या सभेचे कामकाज संपल्यामूळे सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते यानंतर लगेचच दि.३०.१०.२०१३ च्या सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात येईल.

स्वाक्षरीत/-
**नगरसचिव,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका.नांदेड

स्वाक्षरीत/-
**महापौर,**
नांदेड वाघाळा शहरमहानगरपालिका, नांदेड.